1.46
1/2001

# संधन

२००१




**मंथन** सन्मानचिन्ह
शांताराम पवार

संकल्पना
अवघ्या प्राणिमात्राचा सन्मित्र,
करुणाकर

6456

ग्रंथमोजणी
२००५-६: १४.२-६
२००७-८: २०/२/८
२००८-९: १२/१२/८
२००९-१०
२०१०-११: ३०/२/११
२०१२-१३
२०१४-१५
२०१६-१७



**मुखपृष्ठ**
शांताराम पवार

■

**मुखपृष्ठ संकल्पना**
चौकट्यांच्या गर्दीतील संन्यस्त माणसाचे शून्याकार बेट

■

**मांडणी**
भास्कर बोरकर


■

**छायाचित्रे**
विठोबा पांचाळ

**प्रकाशक**
रवी देवगडकर
निमंत्रक
महाराष्ट्र फाउण्डेशन समाजकार्य
गौरव पुरस्कार समिती
केशव गोरे स्मारक ट्रस्ट, 'स्मृती', आरे रोड
गोरेगाव (पश्चिम)
मुंबई ४०० ०६२

■

**मुद्रक**
प्रकाश विश्वासराव
न्यू एज प्रिंटिंग प्रेस, भूपेश गुप्ता भवन
८५, सयानी रोड, प्रभादेवी
मुंबई ४०० ०२५.




6455
८-७-२००२

# नि । वे । द । न

या निवेदनाची सुरुवात करताना माधव साठे यांची आठवण होणे अपरिहार्य आहे. त्यांचा महाराष्ट्रातीलच नव्हे तर महाराष्ट्राबाहेरील समाजिक संस्थांशी सततचा संपर्क होता. त्यामुळे त्यांनी 'पुरस्कार' योजनेचे निमंत्रकत्व अर्थपूर्ण केले होते. त्यांच्या अचानक जाण्याने या 'पुरस्कार' योजनेला वेगळा आकार, आशय देण्याच्या त्यांच्या कल्पना अधुऱ्याच राहिल्या. 'पुरस्कार' योजनेचे हे सहावे वर्ष असल्याने योजनेत अंतभूर्त केलेल्या तीन कार्यक्षेत्रांची दोन आवर्तने आता पूर्ण होत आहेत. त्यामुळे या योजनेसंबंधात माधव साठेंच्या मनात असलेले काही बदल पुढच्या वर्षीच्या योजनेत अंतभूर्त करून त्यांच्या कल्पना साकार करता येतील.

१९९६ पासून 'महाराष्ट्र फाउण्डेशन'ने 'समाजकार्य गौरव पुरस्कारां'ची योजना कार्यान्वित केली. महाराष्ट्रात परिवर्तनवादी सामाजिक कार्य करणाऱ्या अनेक व्यक्ती व संस्था काम करताना दिसतात. अशा व्यक्ती व संस्था यांच्या कार्याचे मोल जाणून घेऊन त्याबद्दल त्यांचा कृतज्ञतापूर्वक सन्मान करावा, या हेतूने 'महाराष्ट्र फाउण्डेशन'ने ही योजना सुरू केली. या योजनेची कार्यवाही 'महाराष्ट्र फाउण्डेशन'ने 'केशव गोरे स्मारक ट्रस्ट'कडे सोपविली आहे.

'महाराष्ट्र फाउण्डेशन'च्या या योजनेमध्ये पुरस्कार देण्याकरिता समाजकार्याच्या तीन क्षेत्रांचा अंतर्भाव केला आहे. १) समाजप्रबोधन, २) स्त्रियांचे प्रश्न व ३) पर्यावरण–संतुलन/संरक्षण. या तीन क्षेत्रांपैकी एका क्षेत्रामध्ये कार्य करणाऱ्या संस्थेला तीन लाख रुपयांचा पुरस्कार व मानचिन्ह देऊन 'महाराष्ट्र फाउण्डेशन' गौरविते. तसेच अन्य क्षेत्रांत काम करणाऱ्या व्यक्ती किंवा संस्थांना शिवाय वैशिष्ट्यपूर्ण समाजकार्य करणाऱ्या व्यक्तींना प्रत्येकी ५० हजार रुपयांचा पुरस्कार व मानचिन्ह दिले जाते.

या योजनेची कार्यवाही करण्याकरिता 'केशव गोरे स्मारक ट्रस्ट'ने वरील क्षेत्रात काम करीत असलेल्या जाणकार व्यक्तींची 'सल्लागार समिती' गठित केली. या समितीने संस्थेला द्यावयाच्या ३ लाख रुपयांच्या २००१ सालच्या पुरस्कारासाठी या वर्षी 'पर्यावरण-संरक्षण/संवर्धन' हे क्षेत्र निश्चित केले. महाराष्ट्राच्या विविध भागांतील पत्रकार, प्राध्यापक, कार्यकर्ते यांच्याकडून पुरस्कार कोणत्या संस्थेला/व्यक्तीला द्यावे, यासंबंधी अभिप्राय मागविण्यात आले. तसेच महाराष्ट्राच्या विविध भागांत प्रसिद्ध होणाऱ्या वर्तमानपत्रांतून या आशयाचे आवाहन करण्यात आले. असे अभिप्राय आल्यावर आवश्यक त्या बाबतीत अधिक माहिती मिळवून 'सल्लागार समिती'ने प्रत्येक पुरस्कारासाठी तीन नावांची शिफारस केली. निवडीसाठी साहाय्यभूत होतील, अशा तऱ्हेच्या संस्था व व्यक्तींच्या कार्यासंबंधींची विस्तृत टिपणेही पाठविण्यात आली. सल्लागार समितीत मृणाल गोरे, पन्नालाल सुराणा, अर्जुन डांगळे, पुष्पा भावे, उल्हास राणे, नागेश हाटकर, सुरेश कराळे, आनंद करंदीकर, कुमार शिराळकर, चंद्रकांत केळकर व रवी देवगडकर यांचा अंतर्भाव आहे. सल्लागार समितीने शिफारस केलेल्या नावांमधून 'महाराष्ट्र फाउण्डेशन'च्या निवड समितीने अंतिम निर्णय घेतला. या गौरव पुरस्कारांसाठी संस्था व व्यक्ती यांच्या नावांचा विचार करताना खालील बाबी विचारात घेतल्या :

१) ज्या सामाजिक संस्था व व्यक्ती आपले कार्य व विचार यांच्या साहाय्याने विवेकनिष्ठा, वैज्ञानिक दृष्टी व सामाजिक न्याय ही मूल्ये रुजविण्यासाठी सातत्याने प्रबोधनाचे कार्य करीत आहेत,
२) पर्यावरण संतुलनाचा ध्यास घेऊन त्यासाठी संशोधन, प्रयोग, लोकशिक्षण, जनसंघटन यांसारख्या विविध मार्गांनी निसर्गाच्या संरक्षणाकरिता ज्या व्यक्ती अविरत कार्य करीत आहेत,
३) ज्या व्यक्तींच्या कार्यामुळे स्त्रियांमध्ये स्वावलंबन व स्वातंत्र्य याविषयीच्या जाणिवा वाढत आहेत आणि अन्यायाविरुद्ध झगडण्याची त्यांची ईर्षा जागृत होत आहे.

या प्रक्रियेत आम्हाला अनेकांचे अतिशय मोलाचे साहाय्य झाले आहे. या सर्वांचे आम्ही अत्यंत आभारी आहोत.

**रवी देवगडकर**
निमंत्रक
समाजकार्य गौरव पुरस्कार निवड समिती
मुंबई

# महाराष्ट्र फाउण्डेशन
# समाजकार्य गौरव पुरस्कार
# प्रदान समारंभ

**२००१चे मानकरी**

**संस्था**
**पर्यावरण-संरक्षण / संवर्धन**
अॅकॅडमी ऑफ डेव्हलपमेंट सायन्स

**व्यक्ती**
**समाजप्रबोधन**
डॉ. मु. ब. शहा, धुळे

**स्त्रियांचे प्रश्न**
न्यायरत्न धुंडिराजशास्त्री विनोद यांच्या स्मृत्यर्थ
श्रीमती कुमुद पावडे, नागपूर

**वैशिष्ट्यपूर्ण समाजकार्य**
श्री. काळुराम दोधडे, पालघर

**समाजकार्य सन्मान**
डॉ. प्रभाकर म्हसकर, अंमळनेर

**अध्यक्ष**
मोहन धारिया

**प्रमुख पाहुणे**
राजेंद्र सिंग

**सूत्र संचालन**
दत्ता बाळसराफ

**समारंभ**
शनिवार दिनांक ५ जानेवारी २००२
सायंकाळी ५.३० वाजता
लोकमान्य सेवा संघाचे
पु. ल. देशपांडे सभागृह
विलेपार्ले (पूर्व) मुंबई

6455

# अर्थकारण व पर्यावरण यांचा समन्वय


■ चंद्रकांत केळकर

विसाव्या शतकातील उत्तरार्धामध्ये भांडवलशाही राष्ट्रांनी जी प्रचंड आर्थिक वृद्धी साधली, त्या वृद्धीमुळे केवळ राष्ट्राराष्ट्रांमधील तीव्र आर्थिक विषमतेची समस्या निर्माण झाली एवढेच नव्हे, तर त्यामुळे मनुष्य समाजाच्या अस्तित्वालाच धोका निर्माण झाला आहे. भांडवलशाहीचा चेहरामोहरा बदलून फार तर विषमतेच्या प्रश्नाची तीव्रता कमी होईल. जोपर्यंत 'सतत आर्थिक वृद्धी' हे भांडवलशाही जगाचे उद्दिष्ट बदलत नाही, तोपर्यंत आर्थिक वृद्धीचे पर्यावरणीय परिणाम मानवी समाजाच्या आत्मनाशाला कारणीभूत होतच राहतील. तथापि, याचा अर्थ असा नव्हे की, विकसनशील देशांनी आपले आर्थिक प्रगतीचे प्रयत्न पर्यावरणीय प्रश्नांच्या भीतीने सध्याच्या राहणीमानाच्या पातळीवर गोठवावेत.

आर्थिक वृद्धीच्या आजपर्यंतच्या अंध वाटचालीला कोणती गृहितके कारणीभूत आहेत व त्या जागी कोणती प्रमेये मांडली पाहिजेत, याचा या भागात विचार केला आहे.

परिसरातील साधने ही निसर्गाची निःशुल्क देणगी आहे व ही साधने अविनाशी आहेत, ही दोन गृहितके भांडवलशाही अर्थशास्त्रीय विचारांमध्ये सुप्तपणे स्वीकारली गेली आहेत. (उदाहरणार्थ, रिकार्डोने जमिनीमध्ये 'अविनाशी गुण' असल्याचे गृहीत धरले.) तसेच उत्पादन प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर निर्माण होणारा कचरा परत निसर्गात फेकल्यावर तो तळ नसलेल्या तळ्यात टाकल्यासारखा पडून राहतो, त्या कचऱ्यामुळे पर्यावरणामध्ये, निसर्गामध्ये, काही गुणात्मक फरक पडत नाही व तो कचरा निसर्ग नेहमीच आपल्यामध्ये सामावून घेतो, असे तिसरे गृहितक आहे. त्यामुळे 'निसर्गावर मात करण्याच्या मानवीसमाजाच्या प्रयत्ना'ला, आर्थिक वृद्धी साधण्याच्या त्याच्या प्रयत्नांना अंत असण्याचे कारण नाही; 'सतत आर्थिक वृद्धी' म्हणजे 'समृद्धी', हे मानवसमाजाने आपले उद्दिष्ट ठेवणे योग्यच आहे, अशी भूमिका वरील तीन गृहितकांच्या आधारे भांडवलवादी समाजमनात तयार झाली आहे.

वस्तुतः मनुष्य समाजाच्या आर्थिक प्रगतीबरोबरच निसर्गामध्येही गुणात्मक बदल होत असतो, त्याचे निकृष्टीकरण (degradation) होत असते. प्रत्येक उत्पादन प्रक्रियेमध्ये त्या प्रक्रियेला साहाय्य करणारा निसर्ग पूर्वीचाच राहत नाही. उदाहरणार्थ, कोळशापासून ऊर्जा मिळविण्याच्या प्रक्रियेमध्ये कोळशाची राख होते. भौतिकशास्त्रातील नियमाप्रमाणे या ऊर्जेच्या उत्पादनानंतर कोळशाच्या होणाऱ्या राखेमध्ये काही ऊर्जा सुप्त (latent) स्वरूपात असते. उरलेली ऊर्जा कोळशाच्या ज्वलनाने निर्माण



केलेली उष्णता व हवेतील कार्बन वायू या स्वरूपात राहते. एकूण ऊर्जा नाश पावत नाही हे प्रतिपादन जरी खरे असले तरी कोळशाने घेतलेले हे राखेचे रूप पुन्हा ऊर्जेच्या उत्पादनाकरता उपयोगी पडत नाही. वस्तुमानात (matter) झालेल्या या बदलामुळे वस्तुमानाला कचऱ्याचे स्वरूप येते. उत्पादन प्रक्रियेत वस्तुमानाचे स्वरूप बदलत असल्यामुळे मनुष्यसमाजाला निसर्गाशी नव्याने संतुलन साधण्याची गरज निर्माण होत असते. या वस्तुस्थितीचे भान भांडवलवादी विचारामध्ये दिसत नाही.

यामुळेच अर्थव्यवस्थेमध्ये उत्पादन, वितरण व उपभोग यांचा प्रवाह चक्रीय असल्याचे गृहीत धरले आहे. या प्रवाहाला सातत्य आहे, असे भांडवलवादी अर्थशास्त्र मानते. खरे तर प्रत्यक्षामध्ये जे सतत कायम राहते, ते त्या प्रवाहातील विनिमयमूल्य असते; त्या प्रवाहातील वास्तव वस्तुमान नव्हे. थोडक्यात, निसर्गाचे अविनाशित्व, निसर्गावर मात करण्याचा प्रयत्न करीत असताना मनुष्य निसर्गामध्ये गुणात्मक बदल करीत नसतो व अर्थव्यवस्थेमध्ये 'चक्रीय प्रवाहा'चे सातत्य असते, ही भांडवलवादी अर्थशास्त्रातील तीन गृहितके पर्यावरणीय प्रश्न निर्माण करण्याला कारणीभूत झाली आहेत.

## निसर्गवादी अर्थकारणाची तत्त्वे

प्रथमतः, अर्थव्यवस्था मग ती एका देशाची असो किंवा जागतिक अर्थव्यवस्था असो, ती एका मोठ्या परिसरव्यवस्थेचा भाग असते व त्यानुसार त्या अर्थव्यवस्थेमधील व्यवहार होणे आवश्यक आहे. त्या

परिसरामध्ये केवळ माणूस हाच एक महत्त्वाचा घटक नसून इतर प्राणी, हवा, वनस्पती, परिसर हेही तितकेच महत्त्वाचे घटक आहेत, ही वस्तुस्थिती अर्थकारणाने स्वीकारणे आवश्यक आहे.

दुसरे, आर्थिक विश्लेषणात निसर्गाचा अंतर्भाव करावयाचा तर 'आर्थिक वृद्धी'चे मापन बदलले पाहिजे. भांडवलाची राशी कायम रहावी यासाठी भांडवलाची होणारी झीज जशी लक्षात घ्यावी लागते, त्याचप्रमाणे उत्पादनामुळे होणारे नैसर्गिक साधनांचे निकृष्टीकरण, त्यांची धूप उत्पादनाच्या खर्चाच्या मापनामध्ये विचारात घ्यावी लागेल. उदाहरणार्थ १९५६ ते १९८६ या काळात अमेरिकेचा 'टिकाऊ आर्थिक कल्याणा'चा निर्देशांक (Index of Sustainable Economic Welfare) उत्पन्नाचे वितरण, नैसर्गिक संसाधनांची धूप व निकृष्टीकरण यांचा अंतर्भाव करून काढला गेला. १९५६ ते १९८६ या दरम्यान ढोबळ राष्ट्रीय उत्पन्न (ढोराउ) वाढत असल्याचे दिसले. परंतु ISEW मात्र १९७० नंतर स्थिर असल्याचे आढळले. कारण वाढत्या उत्पादनामुळे ढोबळ राष्ट्रीय उत्पन्न (ढोराउ) वाढले. परंतु या उत्पादनामुळे होणारा निसर्गाच्या निकृष्टीकरणाच्या स्वरूपातील खर्च त्या ढोबळ राष्ट्रीय उत्पन्नातून वजा होत नाही. ISEW बनविताना तो खर्च वजा केला जातो. त्यामुळे ढोराउ वाढला तरी ISEW वाढेलच असे नाही. परिसराचा विचार करावयाचा तर नेहमीची 'आर्थिक वृद्धी'ची मापने उपयोगी पडणार नाहीत, हे यावरून लक्षात येईल.

तिसरे, भांडवलाची राशी कायम राहावी म्हणून त्याकरिता जशी उत्पादनामुळे होणारी भांडवलाची झीज खर्च म्हणून गणली जाते, त्याचप्रमाणे परिसरातील संसाधनाच्या वापरामुळे परिसराचे होणारे निकृष्टीकरण (degradation) हे खर्च म्हणून गणले जाणे युक्त आहे. या संदर्भात सध्याच्या आर्थिक मापनपद्धतीतील एक विसंगती लक्षात घेणे आवश्यक आहे. उत्पादनामुळे भांडवलाची होणारी झीज ही राष्ट्रीय उत्पन्नाचा हिशोब करताना वजा केली जाते. या उलट, जमिनीच्या पृष्ठभागाची झीज, वृक्षतोड, खनिज संपत्तीचे उत्खनन, प्रदूषण प्रतिबंध, हे खर्च गुंतवणूक म्हणून राष्ट्रीय उत्पन्नामध्ये जमा केले जातात. त्यामुळे संसाधनांच्या राशीत घट होऊ नये यासाठी योग्य प्रकारच्या समाजलेखेची (social accounting) गरज आहे.

चौथे, वर्तमान अर्थकारणाची तत्त्वे केवळ मनुष्यजातीचा विचार करतात. परंतु सर्व प्राणिमात्र, निसर्ग यांच्या संथ विकासाने घातलेल्या मर्यादा डोळ्यांपुढे ठेवून माणसाने आपला विकासाचा व्यूह आखला पाहिजे. तो विकास साधत असताना त्या व्यूहामध्ये गरिबातला गरीब माणूस केंद्रस्थानी असणे आवश्यक आहे. त्याकरिता अन्न, चारा, जळण, पिण्याचे पाणी, आरोग्य, घर व शिक्षण या गोष्टी त्याला पुरेशा व सतत मिळतील, असे विकासाचे उद्दिष्ट असले पाहिजे.

विकासाच्या या सम्यक दृष्टिकोणामध्ये भविष्यातील पिढीचाही अंतर्भाव आहे. परंतु केवळ शासनसंस्थेलाच अशी दृष्टी असू शकते, हे खरे नाही. अशी न्याय्य व टिकाऊ व्यवस्था निर्माण करावयाची तर कोणत्या प्रकारच्या



सामूहिक संस्था व विधी व्यवस्था असणे आवश्यक आहे, याविषयीच्या चिंतनाची गरज आहे. निर्देशन म्हणून असे म्हणता येईल की या व्यूहाचा 'लोकांच्या सहभागाने केलेला विकास' हा आत्मा असेल. अशा व्यूहामध्ये निसर्गसामग्री अनंतकाळपर्यंत उपलब्ध असेल, तसेच तंत्रविज्ञानाचा विकासही अनंतकाळ होत राहील, अशी गृहितके असून चालणार नाही.

या संदर्भात 'क्लब ऑफ रोम'ने सत्तरीमध्ये नेमलेल्या अभ्यासगटाच्या अहवालाचा उल्लेख अस्थानी होणार नाही. मिडोज् आणि मिडोज् यांचा 'लिमिट्स टू ग्रोथ' या नावाचा हा अहवाल आहे. प्रगत देशांनी अवलंबिलेल्या अमर्याद आर्थिक वृद्धीमुळे निर्माण होणाऱ्या मर्यादांविषयीची तीव्र जाणीव या अहवालाने करून दिली. अशा वृद्धीच्या उद्दिष्टाऐवजी 'समतोल' साधण्याचा मार्ग या अभ्यासगटाने सुचविला आहे. त्या मार्गाचे उद्दिष्ट आजच्यासारखे वाढते राहणीमान व म्हणून वाढते उत्पादन हे नसून त्यामध्ये भांडवल व लोकसंख्या यांचा आकार निश्चित असेल. या समतोलात जन्म-मृत्यूची प्रमाणे खालच्या पातळीवर व समान असतील. त्याचप्रमाणे भांडवलनिर्मिती व त्याची झीज ही प्रमाणेही किमान पातळीवर राहतील. या दोहोंतील वेग व सामाजिक धोरण यांत सुसंवाद असेल.

हा समतोल प्रस्थापित करणे म्हणजे स्थितिशीलता पत्करणे नव्हे. या समतोलातही गतिशीलता असू शकेल. अधिक वरच्या पातळीवर माणसाच्या किमान गरजा भागविणे, त्याला दीर्घ आयुरारोग्य मिळवून देणे व उरलेल्या सामग्रीचा वापर माणसाचे ऐहिक जीवन सांस्कृतिकदृष्ट्या संपन्न करण्याकरिता करणे, हे या समतोलाच्या धोरणाचे भाग असतील. तसेच जगाची आजची अवस्था तंत्रविज्ञानाच्या आंधळ्या वापराने निर्माण झाली असली तरी त्यामुळे तंत्रविज्ञान त्याज्य ठरविणे, हे डोळसपणाचे लक्षण ठरणार नाही. तंत्रविज्ञानाच्या वापराला या समतोलाच्या अवस्थेतही अवसर असेल. सामग्रीचा पुनर्वापर कसा करता येईल, याचे संशोधन करण्याकरिता तंत्रविज्ञानाचा वापर करणे इष्ट होईल. असे या अभ्यासगटाचे निष्कर्ष होते.

## विकसनशील देश व विकास धोरण

अशा स्थितीत विकसनशील देशांनी आपल्या आर्थिक विकासाचे प्रयत्न थिजविण्याची आवश्यकता नाही. परंतु हे लक्षात घेणे आवश्यक आहे की हा त्यांच्या विकासाच्या वेगाच्या प्रमाणाचा (scale) प्रश्न नसून त्या विकासाच्या ढाच्याचा (structure) प्रश्न आहे. त्या ढाच्यामध्ये भिन्न भिन्न प्रकल्पांचा अंतर्भाव होऊ शकेल. तसेच हे प्रकल्प त्यांच्या त्यांच्या परिसराशी सुसंवादी असावे लागतील.

हा सुसंवाद साधण्याचे आव्हान तंत्रविज्ञानाने पेलणे गरजेचे आहे.

"The central concern for the sustainable grwoth theory becomes the creativity with which, an economy adapts to continuous changes in the environment, which can be exogenous as also those caused by the interaction of the economic machine with the large eco-system."


हा सुसंवाद साधण्यासाठी ज्या उपक्रमशीलतेची गरज आहे, ती वस्तूंचा पुरवठा वाढविण्याकरिता नसून त्या वस्तूंची मागणी कमी करण्याकरिता आहे. कारण पुरवठा कितीही वाढवीत नेला व मागणीही सतत वाढत राहिली तर तो वाढणारा पुरवठा अपुराच पडेल.

वर उल्लेखिलेला 'क्लब ऑफ रोम'च्या अहवालाचा विकसनशील देशांच्या संदर्भातील दृष्टिकोणाचा येथे उल्लेख करणे युक्त होईल. विकसनशील देशांनी आपल्या विकासाचे चित्र आखीत असताना ते अभ्यासगटाने सुचविलेल्या समतोलाशी सुसंगत असे आखणे शक्य व अगत्याचे आहे. विकसनशील देशांतील मुख्य प्रश्न अधिक उत्पादनाचा व त्यातून उंचावणाऱ्या राहणीमानाचा असला तरी 'राहणीमान' कशाचे बनवायचे व त्याचा मानदंड व त्याची मर्यादा कोणती, हे प्रश्न अधिक महत्त्वाचे आहेत.

सतत वृद्धीच्या उद्दिष्टांमुळे निर्माण होणारा विनाश टाळण्यासाठी जी काही कृती करावयाची ती त्वरेने करणे तर आवश्यक आहेच, पण ती कोणत्या एका देशाने करणे परिणामकारक होणार नाही, ती कृती उभ्या जगाने एक होऊ करणे आवश्यक आहे. हे केल्यास अभ्यासगटाने सुचविलेला समतोल निर्माण होणे शक्य आहे. परंतु याकरिता प्रत्येक राष्ट्राला आपल्या राजकीय व आर्थिक वर्चस्वाच्या आकांक्षा पूर्णपणे सोडाव्या लागतील. हा समतोल म्हणजे स्थितिशीलता नव्हे. तसा अर्थ केला तर आजच्या विकसनशील देशांचा विकास थिजला पाहिजे, असा त्या स्थितिशीलतेचा अर्थ होईल. विकसनशील देशांच्या दृष्टीने अशा समतोलाचा आग्रह म्हणजे वसाहतवादाचे नवे रूप असेल.

('नाणेनिधी' व 'जागतिक बँक' यांचा नव-वसाहतवाद या ग्रंथातून.)

❑❑



# पर्यावरणीय समाजवादाचे नवे राजकारण

■ संजय संगवई

Neither left or Right - we are in the front ही ग्रीन पार्टीच्या प्रारंभीची घोषणा आहे.

भारतातील पर्यावरणीय चळवळी व जाणिवा यांचा गेल्या पन्नासएक वर्षांत वैचारिक, सैद्धान्तिक व संघटन-रणनीतीच्या दृष्टीने अनेक आयामांतून विकास झाला आहे. त्यांच्यावर आपल्या आसपासच्या अन्य मुद्द्यांचा व युरोप, अमेरिका व आशियातील चळवळी व जाणिवांचा प्रभाव पडला आहे. तसेच भारतीय वा तिसऱ्या जगातील म्हणून स्वत:ची काही वैशिष्ट्येही विकसित होत गेली आहेत. देशातील अनेक सामाजिक व राजकीय चळवळींमध्ये पर्यावरणीय मुद्दे पुढे आले आहेत. त्या चळवळींचे स्वत:चे मुद्दे व नव्या पर्यावरणीय जाणिवा यांच्यात परस्पर संवाद-वाद, आदान-प्रदानाची आंतरक्रिया होत होत केवळ 'पर्यावरणीय' वा सामाजिक-राजकीय असे मुद्दे सध्या राहिले नाहीत. या सर्वांचीच मिळून विकासविषयक भूमिका पुढे आली आहे.

पर्यावरणीय जाणिवा व चळवळींनी मुळात विकसविषयक, विज्ञान-तंत्रज्ञान व उत्पादन-उपभोग या विषयी मूलभूत मुद्दे उपस्थित करण्याची सुरुवात मुख्यत: १९८० च्या दशकात सुरू झालेल्या पर्यायी विकासविषयक विचार व संघटनांमार्फत झाली. हा प्रवाह आजवरच्या 'पर्यावरणीय' मानल्या गेलेल्या चर्चा विश्वापेक्षा वेगळा आहे. मात्र ही वेगळी पर्यावरणीय जाणीव भारतातील विकासविषयक राजकीय विचारात १९ व्या शतकापासूनच कमीअधिक प्रमाणात अस्तित्वात होती.

## पार्श्वभूमी

म. फुले यांच्या जंगल व पाणी जनाधिकार या विषयीच्या लिखाणातून ते आढळते. मात्र म. गांधींच्या १९१०च्या 'हिंद स्वराज्य' या लहानशा ग्रंथातून या जाणिवा स्पष्ट आढळतात. भारतीय स्वातंत्र्याचा विचार हा विकासाच्या निवडीचा प्रश्न आहे व हा विचार गांधीजींच्या लेखनातून, कृतीतून आढळतो. त्यातील सखोल पर्यावरणीय जाणीव हे त्याचे वैशिष्ट्य आहे. वस्तुत: गांधीजींनी ही सूत्रे व जाणिवा स्वत: आविष्कृत केल्याचा दावा केला नाही. भारतीय लोकपरंपरा व तत्त्वज्ञान यातून ज्या सहज प्रेरणा येतात त्या गांधीजींच्या लिखाणातून प्रतिबिंबित होतात. गांधींनंतर त्यांचा विचार पुढे नेणाऱ्यांमध्ये अनेक

सर्वोदयी कार्यकर्ते व विचारवंत होते. मात्र त्यात कुमारप्पा, विनोबा यांचे योगदान विशेष होते. कुमारप्पांनी 'इकॉनॉमी ऑफ परमनन्स' (टिकाऊ अर्थव्यवस्था) व अन्य ग्रंथांद्वारे चिरंतन व पर्यावरणीय दृष्टीच्या अर्थव्यवहाराची मांडणी केली होती. सर्वोदयी विकास, पाश्चात्य पर्यावरणीय व नैतिक दृष्टीने अर्थराजकारणाची मांडणी आढळते.

विनोबांनी विज्ञान, नैतिकता व अध्यात्म यांचा अत्यंत चपलख सांधा जुळविला. वस्तुत: विनोबांची या संबंधातील मांडणी ही अत्यंत 'आधुनिक' आहे. विज्ञानाचे त्यांनी स्वागतच केले आहे. मात्र त्याला अध्यात्म/नैतिकतेची दृष्टी मिळाली तरच त्यामुळे विकास साधला जाऊ शकेल असे ते म्हणत. स्वदेशी-विदेशी व तंत्रज्ञानाच्या संदर्भात त्यांचे विचार गांधीवादी म्हणवल्या जाणाऱ्या विचारांपेक्षा वेगळे होते. 'स्वदेशी धर्म' या लेखात ते म्हणतात, ''स्वदेशी धर्म म्हणजे दयाभावाची अंमलबजावणी... स्वदेशी धर्म मायाळू नाही दयाळू आहे. दयेला तारतम्य पाहणे भाग आहे... 'देशी' दारू 'देशी' असूनसुद्धा स्वदेशीला ग्राह्य नाही. उलट स्वित्झरलँडची घड्याळे (खरी जरूर असेल तर) परदेशी असूनदेखील विकत घेण्यास बाध नाही.'' आजचे जागतिकीकरण व विकासाच्या वादविवादात विनोबांचा दृष्टिकोण महत्त्वाचा ठरावा.

गांधीवादी-सर्वोदयींबरोबर डॉ. राममनोहर लोहियांचा समता, विकेंद्रितता व अल्पप्रमाण यंत्र, रोजगार यांना प्राधान्य देणारी जेल-फावडे-मतपेटीची त्रिसूत्री येथील चळवळींवर व कार्यकर्त्यांच्या दृष्टीवर दीर्घ काळ प्रभाव टाकणारी होती. त्यांच्या बहुजन देशीवादाने भारतातील राजकीय, सामाजिक धोरणे व विचारांना दिशा दिली. आजच्या अतिउद्योगवादी, शहरी व उच्चवर्गीय भांडवली जागतिकीकरणाच्या प्रवक्त्यांचा मुख्य हल्ला 'लोहियावादी' विचार-धोरणांवरच प्रामुख्याने असतो. डॉ. लोहियांच्या विचारांमध्ये चिरंतन व पर्यावरणीय विकासाची दृष्टी अनुस्यूत होती.

भारतातील साम्यवादी विचारांमध्ये, धोरण-रणनीतीमध्ये पर्यावरणीय दृष्टी आजवर आढळली नाही. वस्तुत: मार्क्सवादात व त्याही पुढे युरोपातील साम्यवादी राजकारणात पर्यावरणीय जाणिवा आढळतात. १९६०च्या पुढे युरोपात प्रसृत झालेल्या ग्रीन पार्टीचे तेथील समाजवादी व साम्यवादी पक्ष, संघटना यांच्याशी वैर नव्हते. अनेक बाबतीत ग्रीन पार्टी व सोशालिस्ट-कम्युनिस्ट आघाडी करत आले आहेत. मात्र भारतात याच्या उलट वातावरण आहे. येथील जवळ जवळ सर्व साम्यवादी नेत्यांनी विसाव्या शतकापर्यंत तरी पर्यावरणीय जाणिवांना विरोध केला; तसेच विरोध नसेल तर दुय्यम स्थान दिले होते. १९९०च्या दशकात मात्र भारतीय कम्युनिस्ट पक्षाने (CPI) पर्यावरण संरक्षण व चिरंतन विकास या संकल्पनांचे महत्त्व मान्य केले. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षात अजूनही त्या बाबतीत ताठरपणा असला तरी अनेक प्रमुख कार्यकर्ते या बाबत एक समग्र भूमिका घेताना दिसतात. असो.

## स्थितिशील पर्यावरणवाद


१९८०च्या दशकापर्यंत भारतातील पर्यावरणीय जाणिवा, संघटना, चळवळी यांचे तीन प्रवाह होते असे दिसते. पहिला प्रवाह पारंपरिक (किंवा रूढ) पर्यावरण प्रेमींचा आहे. त्यात प्राणी, पक्षी, वनस्पती यांचा अभ्यास, त्यांचे जतन-संरक्षण, संवर्धन व त्यासाठी कायद्यात बदल, न्यायालयात धाव घेणे इत्यादी मार्ग अवलंबणाऱ्या व्यक्ती व संस्थांचा. त्यात वाघ, कुत्री वाचवा इथपासून 'सोसायटी फॉर प्रिवेन्शन क्रुएल्टी टू ॲनिमल्स' (एसपीसीए) ते मेनका गांधीप्रणीत मोहिमा यांचा समावेश होतो. त्यांचे उद्देश चांगले असतात. त्यांची कार्यपद्धती अगदी व्यवस्थित, अभ्यासपूर्ण असते. त्यात प्रामुख्याने समाजातील उच्च व मध्यमवर्ग-वर्णाची माणसे असतात. मात्र १९९० च्या दशकापर्यंत तरी त्यांनी आपल्या उद्दिष्ट व व्यापक कार्याची सामाजिक व पर्यावरणीय प्रश्नांशी नाळ जोडली नाही. किंबहुना त्यापासून दूर राहून जो वर्ग व जीवनशैली या पर्यावरण-ऱ्हासाशी संबंधित आहे, त्यांच्यातच हे कार्य चालते. त्यात स्वत:च्या जीवनाला व हितसंबंधाला धक्का न पोचता पर्यावरण ही एक परात्म वस्तू असल्याप्रमाणे वनस्पती-प्राणी यांच्याविषयी विचार, कार्य होते.

मात्र यात येणाऱ्या तरुण-तरुणींना, लहान मुलांना संवेदनक्षम वयापासून माणसाखेरीज, आपल्याखेरीज इतर अस्तित्वात आहेत व तेही तेवढेच सुरेख, मूल्यवान असते हा संदेश कुठेतरी पाझरतो. पर्यावरणवादाच्या पुढच्या पायरीच्या दृष्टीने ही तयारीच आवश्यक असते. मात्र अनेक वेळा असे पारंपरिक पर्यावरणवादी आपली संरक्षणात्मक भूमिका हीच सर्वेसर्वा आहे असे मानतात. त्यामुळे त्यांची उद्दिष्टे व कार्य यांचा इतर सामाजिक पर्यावरणीय संघटनांशी संघर्ष होतो. महाराष्ट्रात अभयारण्यातील आदिवासींच्या अधिकारांच्या प्रश्नावर (पेंच—तोतला डोह, भीमा शंकर) व उत्तरखंडात 'राजानी नॅशनल पार्क'च्या संदर्भात प्राणी व जंगल संरक्षणवादी समूह व सामाजिक पर्यावरणीय संस्थांचा वाद सुरू आहे, तो पर्यावरण प्रश्नातील जटिलता पुढे आणतो.

स्वत:ला पर्यावरणवादी मानणाऱ्यांचा आणखी एक प्रवाह आहे—व्यवस्थापकीय पर्यावरणवादाचा. यामध्ये अनेक सामाजिक, राजकीय संघटना, औद्योगिक-शहरी हितसंबंधी व खुद्द सरकारचाच समावेश आहे. अगदी आंतरराष्ट्रीय पातळीवर जागतिक बँक, अनेक पर्यावरणीय संस्था,

संयुक्त राष्ट्रप्रणीत पर्यावरण संरक्षण कार्यक्रम इत्यादींचा त्यात समावेश आहे.

या पर्यावरणवादात प्रदूषण, जंगलतोड, जमिनीची धूप, पाण्याचे दुर्भिक्ष इत्यादी 'पर्यावरणीय संकटांचा' (Crisis) विचार होतो. मात्र त्याचे निवारण करण्यासाठी आहे त्या तंत्र-आर्थिक व्यवस्थेच्या चौकटीतच विचार व काम होते. म्हणून प्रदूषणाचा प्रश्न हा सध्याच्या औद्योगिक व्यवस्थेत व तंत्रात बदल न करता त्याचे योग्य मॅनेजमेंट करण्याचाच प्रश्न समजला जातो. तीच बाब वाहतुकीच्या प्रदूषणाची. वाहनांच्या संख्येला, उद्योगाला कुठेही तोशीस न लागता शहर-गावांत झाडे तोडून, लोकांचे विस्थापन करून सोडवला जातो. या 'सोडवण्याचे' पुढील परिणाम सामाजिक समस्या निर्माण होतात असे गृहीत तत्त्व असते. काही संस्था, चळवळींनीही मुख्य प्रश्न उत्पादनाच्या वितरणाचा, मालकीचा आहे असे मानले व उत्पादन पद्धती व तंत्र याला आनुषंगिक स्थान दिले. मात्र १९८०च्या दशकात सुरू झालेल्या अनेक चळवळी व संघटनांनी ही पूर्वीची गृहीतके व प्रमाणके अपुरी ठरवली. स्वातंत्र्यानंतरच्या विकासाच्या अनुभवानंतर त्यातील बलस्थाने व कमकुवत जागा माहीत झाल्यावर त्या विकासाचे बळी झालेल्यांनी व होऊ पाहणाऱ्या जनसमूहांनी ठिकठिकाणी आपापले मुद्दे घेऊन सवाल करायला सुरुवात केली. त्याला जोडूनच या काळातल्या विकासप्रक्रियेची, विज्ञान तंत्रज्ञानाची समीक्षा करणारे



काय होतील याची चिंता करण्याचे फक्त विशिष्ट समस्या सुटेपणाने 'मॅनेज' करणाऱ्यांना कारणच नाही! कोणत्याही समस्येचे धागेदोरे न पाहता, त्याच्या मुळाशी न जाता तात्पुरत्या डागडुजीसारखा हा प्रकार असतो. अगदी जंगलतोडीचा प्रश्नही याच पद्धतीने हाताळला जातो. या सर्वात लोकांचा सहभाग असण्याचा प्रश्नच नाही. पर्यावरणवाद व कार्याचे वरील दोन्ही प्रकार तज्ज्ञशाही व केंद्रीकृत निर्णयपद्धती यांनाच बळकटी देते. या पर्यावरणीय व्यवस्थापनाच्या विचारात सध्याचे विकास प्रकल्प, योजना, धोरणे व त्या मागील तंत्र-वैज्ञानिक धारणा याच योग्य असून सध्याची उत्पादन पद्धतीच प्रमाण मानून त्यांच्या अंमलबजावणीमुळे पर्यावरणीय, तज्ज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, वैज्ञानिक, समाजशास्त्रज्ञदेखील आता खुलेपणाने आपली भूमिका मांडू लागले; लोकांच्या उठावामागील कारणांचा शोध घेऊन ती पुढे आणणारी पत्रकारिताही त्याच काळात सुरू झाली.

## चिरंतन विकासाकडे

१९८०च्या दशकाच्या प्रारंभी 'सायलेंट व्हॅली' धरणाच्या विरोधातील आंदोलन, भोपाळ विषारी वायू दुर्घटना, छत्तीसगढ मुक्ती मोर्चाचा वेगळा कामगार संघर्ष, सुवर्णरेखा व झारखंडमधील इतर धरणांच्या संदर्भातील आदिवासींचे संघर्ष सुरू झाले. चिपको आंदोलन व टिहरी धरणाविरुद्धचा संघर्षही आकार घेत होता. हरितक्रांतीच्या गौरवाचा

काळ संपून त्याचे दुष्परिणामही दिसू लागले. देशभरात विस्थापितांची समस्या गंभीर बनत चालली होती. आजच्या विकासावर, प्रगतीवर प्रश्नचिन्ह गडद होत चालले. १९८०च्या दशकाच्या उत्तरार्धात नर्मदा खोऱ्यातील सरदार सरोवर धरणाविरुद्ध आदिवासी शेतकऱ्यांचे आंदोलन व किनारपट्टीवरील मच्छिमारांचे आंदोलन व अन्य चळवळींनी आजच्या विकास प्रकल्पांना, त्यामागील धोरणांना व विकासाच्या धारणेलाच आव्हान दिले.

अनेक तऱ्हेचे संघर्ष १९८० व १९९० च्या दशकात उभे राहिले. नवी विश्लेषणे, पर्यायी शोध व प्रयोग यांनाही वेग आला. आजवरच्या ज्ञान-विज्ञानाच्या पायावरच पर्यायी प्रयत्न सुरू आहेत. या सर्वांमध्ये भारताच्या संदर्भात विकसित झालेली सामजिक, पर्यावरणीय दृष्टी महत्त्वाची ठरते. जमीन, जंगल, धरणे, विस्थापन, पाणी, खाणी, मच्छिमारी या संदर्भातील अनेक चळवळींतून नवी पर्यावरणीय दृष्टी दिसते. आजवर 'पर्यावरणीय' न समजल्या गेलेल्या मुद्द्यांमध्ये व चळवळींमध्येही त्यातील काही जाणिवा आहेत. उदा. छत्तीसगढ व गिरणगाव बचाओ आंदोलनात किंवा नवसाम्यवादी व ज्याला नक्षलवादी म्हणतात अशा संघटनांच्याही—पीपल्स वॉर ग्रुप—कामात काही प्रमाणात पर्यावरणीय चेतनेचे अंश दिसतात. भारतातील नारीवाद, नव-सर्वोदयवाद, नवा समतावाद या सर्वांशी त्याचे नाते आहे. मात्र पर्यावरणीय जाणिवा व चळवळीचा हा तिसरा व लोकाभिमुख मूलभूत प्रवाह आहे. आधीच्या पाहिलेल्या दोन प्रवाहांपेक्षा हा प्रवाह पूर्णत: वेगळा आहे. या पर्यावरणीय दृष्टीत पर्यावरणीय समस्यांकडे मूलगामी पद्धतीने व सामाजिक, आर्थिक व राजकीय संदर्भात पाहिजे जाते. किंबहुना पर्यावरणीय संदर्भ हे इतर घटकांच्या जोडीने येतात. असा समग्रतेचा पर्यावरणीय विचार आज अगदी प्रदूषणाविरोधी आंदोलनातही दिसतो. कोकणातील लोटे परशुराम औद्योगिक वसाहत किंवा इतरत्रचे औद्योगिक प्रदूषण हा मुद्दा फक्त प्रदूषण-नियंत्रण यंत्रणा बसवण्यापर्यंत मर्यादित राहत नाही, तर मुळात कोणते उद्योग हवेत, त्यांचे तंत्रज्ञान कोणते हवे, त्याचे राजकीय-आर्थिक हितसंबंध कसे असावेत अशा समग्रतेतून ते मुद्दे उभे राहतात. हा विकासाचाच प्रश्न होऊन बसतो.

## लोकशाही, समता, पर्यावरण

नव्या पर्यावरणवादात पर्यायी विकासाच्या धोरणाची बीजे सापडतात. या पर्यायी विकासाच्या अवधारणेत पर्यावरण, समता व लोकशाही या बाबी विकासाचा भाग म्हणूनच समजल्या जातात. आजवरच्या विकासात फक्त तंत्र-वैज्ञानिक व आर्थिक (वाढ) एवढेच अभिप्रेत राहत आले. समता, लोकशाही प्रक्रिया व पर्यावरणीय मुद्दे हे फक्त आनुषंगिक व बाह्य (external) गणले जात आले. म्हणजे आर्थिक-तांत्रिक प्रगतीचा मुद्दा आला की लोकांच्या अधिकाराचे, विस्थापन, पर्यावरणीय लाभ हे कळीचे मुद्दे गौण ठरवायचे किंवा त्याच्याबाबत समझोता करायचा असा प्रकार होत आला आहे. नव्या विकासाच्या संकल्पनेत पर्यावरण व लोकशाही अधिकार हेदेखील 'विकास' मानले जातात. सामान्य लोकांची स्वत:च्या अधिकाराची, स्वायत्ततेची, इतरांच्या व परिसराच्या जपणुकीची भावना हे विकसित होत जाण्याचे लक्षण आहे. म्हणून ते ज्या प्रकल्प व धोरणात नसतील तो 'विकास' नव्हे ही बाब देशभरातील अनेक पर्यावरणीय, समाजवादी चळवळी आता पुढे आणत आहेत.

या चळवळी, समीक्षा व विचारांमधून आजवरच्या वर्चस्ववादी ज्ञान-विज्ञानासंबंधीही सवाल केले गेले. एका प्रकारचे, एका वर्गाचे ज्ञान म्हणजेच ज्ञान व विज्ञान आहे या गृहीतकाला आव्हान दिले जात आहे. ज्ञानाची व लोकविज्ञानाची नवी, बहुलवादी समज रुजविण्याचा या चळवळींचा प्रयत्न आहे. साधारण जनसमूहदेखील हजारो वर्षे आपल्या बुद्धी, परंपरा, सृजनक्षमतेने शेती, पाणी, आरोग्य, तांत्रिक-वैज्ञानिक समज विकसित करत आला आहे. लोकभाषा, लोकज्ञान व त्यांच्या अधिकारांना गौण लेखण्याची वसाहती वृत्ती यापुढे चालणार नाही, हे राजस्थानमधील 'तरुण भारत संघा'च्या पाणी, जंगल याविषयीच्या कार्यातून दिसते. जनसमूहांनी स्वत: निणर्य घेऊन आपल्या साधनसंपदेचे नियोजन करण्याचा हा वस्तुपाठ होय. यातूनच नैसर्गिक साधनसंपदेवर तेथील जनसमूहांचा समतायुक्त अधिकार आहे, हे तत्त्व आदिवासी व अन्य चळवळींतून पुढे आले. कर्नाटकातील धारवाडमधील सामुदायिक जमिनीच्या संघर्षापासून ते नर्मदा खोऱ्यातील बरगी व तवा धरणाच्या विस्थापितांनी जलाशयावरच्या मासळीवर घेतलेला अधिकार व अभयारण्य क्षेत्रातील आदिवासी, शेतकऱ्यांच्या लढ्यापर्यंत 'साधनसंपदेवरच्या अधिकारांचा मुद्दा' महत्त्वाचा ठरला आहे.

पर्यायी विकासाच्या लढ्यात आपल्या साधनसंपदेवरचा अधिकार हा कधीच एकमेव स्थानिक समूहांचा मानला नाही. मात्र प्राथमिकता व पहिला अधिकार जे या साधनसंपदेवर निर्भर आहेत त्यांचा मानला. त्यांच्या गरजा भागल्यावर क्षेत्रीय व राष्ट्रीय उपयोगासाठी जल, जंगल, जमिनीचा चिरंतन पद्धतीने उपयोग करता येईल ही भूमिका राहिली आहे.

पर्यायी विचारात लोकशाही अधिकारांशी संबंधित महत्त्वाचा मुद्दा निणर्यप्रक्रियेचा ठरत आहे. विकेंद्रित निर्णयप्रक्रिया म्हणजे अलगाव राज्याला नकार असा अर्थ काढणे ही अतिव्याप्ती होय. विकेंद्रितता ही सत्तासंबंधांच्या स्वरूपात अभिप्रेत आहे. कुणाच्या भविष्याविषयी निणर्य कुणी



घ्यायचे हा सवाल गेल्या काही वर्षांत पुढे आला आहे त्यालाच जोडून राष्ट्राचा प्रश्नही आता पेचाचा झाला आहे. ज्यांच्या जीवनाचा बळी देऊन 'विकास' केला जातो ते या राष्ट्राचा हिस्सा नाहीत का? नर्मदा खोऱ्यातील लोक विचारतात की "आमचे जंगल, संपन्न शेती व आमचे जीवन नष्ट करणे म्हणजे राष्ट्रहित आहे? तसे असेल तर हे राष्ट्रहित म्हणजे कोणाचे हित? कुणाचे राष्ट्र?" या सवालांना आता सर्वांनाच सामोरे जावे लागेल. तंत्रज्ञान, विज्ञान, राष्ट्र, राज्य, विकास या गृहीत धरलेल्या सिद्धान्तांवरील शेंदूर काढण्याचे, त्यांचे मिथक तोडण्याचे व गूढतेवर झगझगीत प्रकाश टाकण्याचे काम या चळवळींमधून होत आहे.


## विधायक राजकारण

या बरोबरच काय हवे याचाही विचार व कृती होत आहे. त्याला पर्याय म्हणा वा योग्य विकास म्हणा; ऊर्जा, शेती, जमीन व पाणी व्यवस्थापन, शिक्षण, आरोग्यसेवा, उत्पादक, बाजार या सर्व बाबतीत पर्यायी मार्ग शोधणारे व रूढ करणारे अक्षरश: शेकडो गट भारतात कार्यक्षम आहेत. या सर्वांचे आजवरचे विज्ञान, ज्ञान व विकास पचवून त्या पलीकडे जाण्याचे प्रयत्न आहेत. त्या अर्थाने ते 'आधुनिक' किंवा समकालीन आहेत. विकासाचे आजपर्यंतचे मार्ग आता कालबाह्य झाले असून नव्या संकल्पनांसहित विकासाची विचारधारा घडवण्याचे व प्रत्यक्षात आणण्याचे आव्हान अनेकांनी स्वीकारले आहे.

मात्र असा लोकाभिमुख, समतावादी व चिरंतन पर्याय शोधण्याची जबाबदारी केवळ सध्याच्या विनाशकारी विकासाला विरोध करताहेत त्यांचीच आहे असे नाही. याउलट या योजना व धोरणे घडवणाऱ्यांची व इतर तज्ज्ञ, कार्यकर्ते, संघटना व राज्यांचीही आहे. 'करू तर फक्त विनाशच करू' असे राज्याला म्हणून चालणार नाही.

आज पर्यावरणीय चळवळींचा प्रवाह इथपर्यंत येऊन पोचला आहे. हा मुद्दा मूलभूत अर्थाने राजकारणाचा झाला आहे. या पर्यावरणाच्या राजकारणात सर्वच लोकशाहीवादी व समतावादी तसेच पर्यावरणविषयक जाणिवा असलेल्यांनी योगदान देण्याची गरज आहे. या पर्यावरणवादाने आजवरच्या भांडवली, उपभोगवादी व केंद्रीकृत विकासाच्या राजकारणासमोर मूलभूत सवाल उभे केले आहेत. म्हणून आज सर्वच प्रस्थापित शक्ती— डाव्या, उजव्या, मूलतत्त्ववादी, क्षुद्रवादी (Parochial)— या पर्यावरणीय समाजवादाच्या विरोधात उभ्या आहेत. त्यांना तोंड द्यावे लागेल; वाद-संवादाचा व समन्वयाचा प्रयत्न करावाच लागेल. आपणाला जर गंभीरपणे पर्यावरणाची आस असेल तर त्याच्यासाठी सार्वजनिक अवकाशात (Public Space), तिथल्या धूळ-उन्हात उतरावे लागेल. फक्त चर्चासत्रे, निबंधलेखन-वाचन किंवा पहिल्या दोन पद्धतींच्या (पारंपरिक व व्यवस्थापकीय) पर्यावरणवादाच्या पलीकडे जावे लागेल.

❑❑



# विकासाच्या ज्वराने पांगळे होणारे पर्यावरण

■ विजय दिवाण

भारत हा उष्णकटिबंधातला एक खंडप्राय देश आहे. वैशिष्ट्यपूर्ण भौगोलिक रचना, भरपूर सूर्यप्रकाश आणि चांगले पर्जन्यमान यामुळे या देशात नैसर्गिक संसाधनांची विपुलता आहे. अनेक नद्या, मोठे पर्वत, निरनिराळ्या प्रकारची जंगले आणि प्राणिसंपदा यामुळे भारताला संतुलित पर्यावरणाचा नैसर्गिक वारसा लाभलेला आहे. जैव-विविधतेच्या दृष्टीने जगातील जी बारा राष्ट्रे महा-राष्ट्रे म्हणून घोषित झालेली आहेत त्यांत भारताचा क्रमांक आठवा लागतो. जागतिक जैव-विविधतेच्या आठ टक्केएवढी जैव-विविधता एकट्या भारतखंडात आढळून येते. लोकसंख्येने भरपूर असलेल्या इथल्या जनतेच्या वास्तव अशा साऱ्या गरजा भागवता येण्याइतकी नैसर्गिक साधनसंपत्ती इथे उपलब्ध आहे आणि या साधनसंपत्तीचा योग्य वापर करण्यासाठी आवश्यक असणारे ज्ञानही इथल्या लोकांकडे परंपरागत आहे. जिच्याद्वारे पर्याप्त प्रमाणात नैसर्गिक संसाधनांचा वापर करून लोकांच्या आवश्यक गरजा भागवून त्या संसाधनांची पुनर्वृद्धीही करता येईल अशी एक स्वयंपूर्ण अर्थव्यवस्था निर्माण करण्याची संधी भारताला स्वातंत्र्यप्राप्तीने मिळाली होती. पण तरीही एवढा समृद्ध निसर्ग असलेल्या या भूमीत विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात जमीन, जंगल आणि पाणी या संसाधनांचा फार मोठा ऱ्हास झाला.

चुकीचे आर्थिक नियोजन आणि विकासाचे गैरलागू आकृतिबंध ह्या कारणांसोबतच सत्ता बाळगून असणाऱ्यांचे हितसंबंध हेही या ऱ्हासाचे एक कारण होते. निसर्गसंपत्तीची अशी हानी होणे हे संकटासमान आहे याचे आम्हाला नुकतेच कुठे भान येऊ लागले होते. तोच आता नव्या शतकाच्या प्रारंभी, जागतिकीकरणाच्या परिणामांचा मोठा फटका आपल्या निसर्गसंपत्तीला आणि पर्यावरणाला बसू पाहत आहे.

अठराव्या शतकातल्या औद्योगिक क्रांतीनंतर अमेरिका, इंग्लंड आणि युरोपातील काही राष्ट्रांनी विकासाचा एक विशिष्ट आकृतिबंध स्वीकारला. विज्ञान आणि अत्याधुनिक तंत्रज्ञान यांच्या साहाय्याने नैसर्गिक संसाधनांचा अमर्यादा वापर करून उत्पादनवाढ करणे आणि त्याद्वारे आपली संपत्ती वाढवणे हे त्याचे वैशिष्ट्य होते. या संपत्तीचा वापर जगावर सत्ता गाजवण्यासाठी करणे हे एक उद्दिष्ट त्यात अनुस्यूतच होते. मोठ्या प्रमाणावर भांडवल गुंतवणूक करून उत्पादनवाढ करणे, खासगी भांडवलाचे वर्चस्व कायम राखणे, जगाच्या बाजारात खुली स्पर्धा राखणे आणि शासनाचे नियंत्रण कमीतकमी ठेवणे ही या पाश्चिमात्य विकास प्रक्रियेची वैशिष्ट्ये होती. दुर्दैवाची गोष्ट ही की विसाव्या शतकात स्वतंत्र झालेल्या भारत, पाकिस्तान, थायलंड, इंडोनेशिया, मलेशिया, दक्षिण कोरिया अशा अनेक विकसनशील राष्ट्रांनीही स्वत:च्या विकासासाठी हा पाश्चिमात्य आकृतिबंधच स्वीकारला. या विकसनशील राष्ट्रांमध्ये बहुसंख्य जनता अशिक्षित आणि दरिद्री होती. साहजिकच तिथल्या आर्थिक आणि राजकीय सत्तेची सर्व साधने सधन आणि उच्चभ्रू लोकांच्या हाती एकवटली. या सगळ्या देशांमधले मोठे व्यापारी, उद्योगपती, सुखासीन जगण्याला चटावलेले उच्च मध्यमवर्गीय लोक, उच्चपदस्थ अधिकारी आणि तंत्रज्ञ आणि सार्वजनिक संपत्तीवर डोळा ठेवून असणारे भ्रष्ट राजकीय नेते, ह्या मंडळींना त्यांचे हितसंबंध जपणारा विकासाचा हा पाश्चिमात्य आकृतिबंधच सोयीचा होता. कोणत्याही भूमीची नैसर्गिक साधनसंपत्ती ही जशी तिच्या पर्यावरणाचा आधार असते तद्वतच ती तिथल्या गोरगरीब जनतेच्या जगण्याचाही आधार असते. विकसनशील अशा या साऱ्या देशांमध्ये अनेक वर्षे आर्थिक आणि राजकीय सत्ता बाळगून असणाऱ्या विशिष्ट वर्गाने विकासाच्या नावाखाली तिथल्या नैसगिक साधनसंपत्तीचे अमर्याद शोषण केले. परिणामी, आज एकविसाव्या शतकाच्या उंबरठ्यावर असताना, भारतात जमीन, जंगल आणि पाणी या नैसर्गिक संसाधनांची मोठी नासधूस



होऊन एकीकडे पर्यावरणास क्षती पोचलेली दिसते, तर दुसरीकडे स्वातंत्र्य मिळून पन्नास वर्षे लोटल्यावरही सर्वसामान्य लोकांना विकासाची फळे चाखावयास मिळालेली नाहीत असे दिसते.

## विद्रूप होणारी काळी आई

शेतजमिनी, वनराया आणि जंगले यांतील सुपीक जमीन ही आपल्याला अन्न देणारी काळी आई आहे असे आपण पूर्वीपासून मानत आलो आहोत. पण भारतात ह्या आईची अतोनात परवड झालेली आहे. या देशातील बहुतांश सुपीक जमीन ही धूप झाल्याने आज नापीक झाली आहे. अधिकृत आकडेवारीप्रमाणे भारतात एकूण ३२.९ कोटी हेक्टर एवढी सुपीक, उपजाऊ जमीन आहे. तीपैकी १४.१ कोटी हेक्टर जमीन ही पावसाचे वाहते पाणी आणि वारा यांमुळे धूप होऊन पडीक बनली आहे, तर आणखी ३.४ कोटी हेक्टर जमीन ही क्षारवृद्धी आणि अतिसिंचनाने निकामी झाली आहे. भारतातल्या साऱ्या नद्यांवर अनेक धरणे बांधण्यात आली आहेत. या सगळ्या धरणांच्या जलाशयांखाली लाखो हेक्टर सुपीक जमीन बुडाली आणि त्याचप्रमाणे हजारो हेक्टर जंगलही बुडितात गेले. या धरणांच्या पाण्यावर जागोजागी रोखीच्या पिकांची बागायती शेती वाढली. अशा शेतीत पाण्याची आणि खते-कीटकनाशके यांच्या वापराची मात्राही फारच असते. परिणामी, या मातीतून पाण्याचा निचरा होणे बंद झाले आणि तीत क्षारांचे प्रमाण फार वाढले. त्यामुळेही कोट्यवधी हेक्टर

जमीन वाया गेली. या धरणांच्या जलाशयांच्या परिसरांत साखर कारखाने, कागद आणि लगद्याचे कारखाने, रंगांचे आणि रसायनांचे कारखाने उभे राहिले. त्यांचे दूषित सांडपाणी मिसळूनही हजारो हेक्टर जमिनीचे नुकसान झाले आहे.

नद्यांच्या खोऱ्यांमध्ये आणि मोठ्या तलावांच्या स्रवण क्षेत्रांमध्ये वर्षानुवर्षे वृक्षतोडही मोठ्या प्रमाणावर होत राहिली आहे. अशा रीतीने तोडल्या जाणाऱ्या प्रत्येक वृक्षासोबत तिथल्या मातीला जमिनीशी घट्ट बांधून ठेवणारी मुळेही नष्ट होतात. मग अशी उसवलेली माती पावसाच्या पाण्याबरोबर वाहून जाऊ लागते. डोंगरउतारांवरून ओढे, नाले आणि नद्या यांतून वाहत जाऊन ती गाळ बनते आणि शेवटी समुद्रांत जाऊन पडते. भारतात दर वर्षी सुमारे ६०० कोटी टन एवढी सुपीक माती पावसाच्या पाण्यासोबत वाहून जात असते. तिचे दर माणशी प्रमाण प्रतिवर्षी सहा टन इतके होईल. ह्या वाहून जाणाऱ्या या नैसर्गिक खताचे दर माणशी प्रमाण साठ किलो एवढे होईल. विकासाच्या नावाखाली राबवल्या जाणाऱ्या अनेक योजनांमुळे आपल्या जमिनी मोठ्या प्रमाणावर निकामी होत आहेत. पडीक होत जाणाऱ्या या जमिनींचे प्रमाण इतके मोठे आहे की त्यामुळे भविष्यकाळात वाळवंटीकरणाचा धोका संभवतो. ह्या साऱ्या जमिनींची सुधारणा घडवून आणणे हे एक पर्यावरणीय आव्हानच म्हणावे लागेल.

## जंगल खाणारा विकास

इंग्रजांच्या काळापासून भारतात सुमारे ७.७ कोटी हेक्टर एवढी जमीन ही वनांखालची जमीन म्हणून नोंदलेली आहे. भारताच्या एकूण भूप्रदेशाच्या २३ टक्के इतका भाग जंगलाने व्यापलेला आहे असे सांगितले जाते. परंतु आज प्रत्यक्षात फक्त १९.४६ टक्के भूप्रदेशावरच जंगल उभे आहे. त्यातही खरोखरचे घनदाट जंगल फक्त ११.७३ टक्के भूप्रदेशावर आहे. आपली आजची लोकसंख्या लक्षात घेता या जंगलाचे प्रमाण दर माणशी केवळ ०.०८ हेक्टर इतकेच पडेल. याच्या तुलनेत हेच दर माणशी प्रमाण कॅनडात १४.२ हेक्टर, अमेरिकेत १३ हेक्टर आणि ऑस्ट्रेलियात ७.६ हेक्टर एवढे आहे. आपल्यापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या चीनमध्येसुद्धा हे प्रमाण ०.१३ हेक्टर एवढे म्हणजे आपल्यापेक्षा जास्त आहे. आज भारताची लोकसंख्या ही जगाच्या लोकसंख्येच्या १६ टक्के आहे. आपल्याकडील गुरे-ढोरे जगाच्या पशुधनाच्या १५ टक्के आहेत. पण जगातल्या एकूण जंगलापैकी फक्त एक टक्का जंगलच या दोहोंच्या वाट्याला येते. १९४७ साली स्वातंत्र्य मिळाल्यापासून आजपर्यंत भारतात निरनिराळ्या विकास-प्रकल्पांच्या निमित्ताने दरवर्षी सुमारे दीड लाख हेक्टर एवढ्या जंगलाचे रूपांतर बिगर-जंगल जमिनीत करण्यात आले आहे. असे आपले बहात्तर लाख हेक्टर जंगल हे व्यापारी वापरासाठी हस्तांतरित झालेले आहे. ही बाब खरोखरच चिंताजनक आहे.

आपल्या इतिहासाकडे नजर टाकली तर असे दिसेल की आपल्या ग्रामीण अर्थव्यवस्थेला जंगलांचा मोठा आधार होता. या देशातले सुमारे साठ टक्के लोक हे स्वतःच्या अन्न, औषधं, चारा, जळण, धागा आणि लाकूड या गरजांसाठी जंगलांवर थेट अवलंबून असते. ही जंगले इथल्या अडीचशे निरनिराळ्या जमातींच्या सहा-सात कोटी आदिवासी लोकांच्या जीवनाचा आणि संस्कृतीचा अविभाज्य भाग बनून राहिलेली होती. ह्या आदिवासींनी त्यांना परंपरेतून प्राप्त झालेले शहाणपण वापरून सामूहिक जबाबदारीच्या जाणिवेने ह्या जंगलांचे संवर्धन आजवर केले होते. जंगलांचा वापर केवळ अत्यावश्यक गरजांपुरताच करून त्यांची पुनर्वृद्धी होऊ देण्याचे भान त्यांनी राखले होते. परंतु विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात लोकांच्या आणि गुरा-ढोरांच्या प्रचंड वाढणाऱ्या संख्येचा दबाव जंगलांवर पडायला सुरुवात झाली. मग वाढीव शेतजमीन निर्माण करण्यासाठी, खाणप्रकल्पांसाठी, रस्ते आणि धरणे यांच्या विकासासाठी आणि लाकडाच्या व्यापारी उत्पादनासाठी बेफाम अशा जंगलतोडीला सुरुवात झाली. पाहता पाहता भारतीय उपखंडातले जंगल प्रमाणाबाहेर नष्ट झाले. आजही मोठ्या धरणांचे प्रकल्प, जलविद्युत योजना आणि खाण प्रकल्प यांच्या उभारणीत हजारो हेक्टर जंगल नष्ट केले जात आहे. मोठ्या धरणांचे समर्थक नेहमी असा दावा करत असतात की धरणांमुळे वरच्या भागांत जेवढी जैवसंपदा बुडितात जाते तिच्या कैक पटींनी जास्त जैवसंपदा खाली लाभक्षेत्रात निर्माण होते. हा दावा काही खरा नाही. भारतात असलेल्या ५४ मोठ्या धरणांपैकी किती धरणांच्या लाभक्षेत्रांमध्ये त्यांना सिंचनाचे ठरलेले लक्ष्य संपूर्णपणे गाठता आलेले आहे? एकाही नाही. या बाबत आकडेवारी देताना नेहमी सिंचनाखाली येणाऱ्या प्रस्तावित क्षेत्राचेच आकडे दिले जातात. प्रत्यक्ष भिजणाऱ्या क्षेत्राचे नाही. शिवाय लाभक्षेत्रात जी काही जमीन भिजते तिच्यामधून बुडालेल्या जंगलासारखी वैविध्यपूर्ण जैवसंपदा निर्माण होते का? लाभक्षेत्रात तिथली जैवविविधता पूर्णपणे

नष्टच होते याचे भान विकासप्रकल्प राबवणाऱ्या आपल्या तंत्रज्ञांनी आणि नोकरशहांनी ठेवले नाही. त्यामुळे देशाच्या अनेक भागांतल्या परिस्थितीय संरचनांचे अतोनात नुकसान झालेले आहे. मुळात ७.७ कोटी हेक्टर इतके नोंदले गेलेले भरतखंडातले जंगल आता आकसत जाऊन ४ कोटी हेक्टर एवढेच उरले आहे.

## प्रकल्पांमध्ये रुतलेले जलचक्र

पृथ्वीवरचे बहुतांश पाणी हे समुद्रांचे खारे पाणी आहे. माणसाला वापरता येण्याजोग्या साध्या पाण्याचे प्रमाण पृथ्वीवर केवळ ३ टक्के एवढेच आहे. त्यातून कायमस्वरूपी बर्फाच्या रूपात थिजलेले पाणी वगळले तर माणसाला उपसता येण्याजोगे साधे पाणी हे पृथ्वीवर फक्त एक टक्का एवढेच आहे. याचा अर्थ असा की पृथ्वीवरची लोकसंख्या जर अशीच वाढत राहिली तर सर्वांना पुरेल एवढे पाणी पृथ्वीवर उपलब्धच होणार नाही. नद्या आणि सरोवरे यामध्ये पृथ्वीवरचे प्रवाही पाणी असते, तर जमिनी-खाली भूजलाचे बंदिस्त साठे असतात. आज जगात या उपलब्ध पाणीसाठ्यापैकी सुमारे ५४ टक्के प्रवाही पाणी आणि ३० टक्के भूजल यांचा उपसा होत आहे आणि तरीही जगातले सुमारे ४० कोटी लोक आज कायमस्वरूपी पाणीटंचाई भोगत आहेत. बाल्टिमार येथे असलेल्या 'जॉन हापकिन्स आरोग्य विद्यापीठा'च्या एका अहवालात म्हटलेले आहे की २०५० सालापर्यंत अत्यंत तीव्र अशा पाणीटंचाईशी सामना करणाऱ्या लोकांची संख्या चारशे कोटीपर्यंत वाढेल. म्हणूनच पाणी हे फुकट आणि हवे तसे वापरता येण्याजोगे संसाधन नाही हे आपण लक्षात ठेवले पाहिजे.



भारतात उपलब्ध असलेल्या पाण्यापैकी सुमारे ८० टक्के पाणी हे शेतीत सिंचनासाठी वापरले जाते. परंतु त्यातले अर्धे पाणी पिकांपर्यंत पोचण्याआधीच वाया जाते. याचे कारण वर्षानुवर्षे होणारे अपुरे तंत्रज्ञान आणि सिंचनाच्या कालबाह्य पद्धती यांचा वापर हे होय. त्यामुळे अपेक्षित असे सिंचन तर दूरच, पण पिण्याच्या पाण्याच्या टंचाईवरही आपले पाणी प्रकल्प मात करू शकत नाहीत असे चित्र आज दिसते. आजच्या सिंचन प्रकल्पांच्या कार्यक्षम-तेत अवघी दहा टक्के जरी सुधारणा करता आली तरी पाण्याचे पुरेसे संवर्धन होऊन पिण्याच्या पाण्याचा साठा दुप्पट होईल असे तज्ज्ञांचे मत आहे. स्वातंत्र्योत्तर काळात आपल्या देशात पाणी-विकासासाठी ज्या दोन प्रकारच्या गोष्टींना प्राधान्य दिले गेले त्यांत धरणांनी नद्या अडवून प्रचंड जलाशय निर्माण करणे आणि भूजलाचा उपसा करण्याच्या भरमसाठ योजना राबवणे यांचा अंतर्भाव होता. या साऱ्या योजनांमधील भांडवली गुंतवणूक आणि त्यांच्या देखभालीचे खर्च हे प्रचंड असतात. शिवाय प्रकल्पांच्या हाताळणीत अपरिहार्यपणे घुसणाऱ्या अकार्यक्षमता आणि भ्रष्टाचार या दोन व्याधींमुळे कोणतेही प्रकल्प वेळेवर पूर्ण होऊ शकत नाहीत आणि म्हणून त्यांच्यावरील खर्च शेवटी दुपटीने वाढतो. याच कारणाने आजवर आपला कोणताही मोठा पाणी प्रकल्प हा आय-व्यय प्रमाणाच्या दृष्टीने समाधानकारक ठरू शकलेला नाही आणि तरीही आपण नेहेमी आपल्या विकासाचे एक

मानक म्हणून या जल-प्रकल्पांचा उल्लेख बिनदिक्कत करीत असतो. वस्तुस्थिती अशी आहे की स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या चाळीस वर्षांमध्ये या देशातील तंत्रशाहीने पाण्याचे पुनर्भरण आणि संवर्धन करण्याला प्राधान्यच दिले नाही. पराकोटीचे अभियांत्रिकी कसब वापरून भरमसाठ खर्चाचे प्रचंड मोठे जल-प्रकल्प उभे करत असताना त्यांच्या आर्थिक, सामाजिक आणि पर्यावरणीय अशा लाभ-हानींचा विचार गांभीर्याने कधी केलाच नाही. आजही ते हा विचार करावयास तयार नाहीत असेच एकूण चित्र दिसते.

येणाऱ्या काळात पाणी हे निरंतर विकासाचे प्रमुख माध्यम असणार आहे. पृथ्वीच्या नैसर्गिक व्यवस्थेत पाणी कोणती भूमिका बजावत असते हे आपण लक्षात घेतले पाहिजे. जल-विकास प्रकल्पांच्या योजना आखताना निसर्गातील जलचक्राच्या फिरतीला बाधा येणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे. पाणीटंचाईशी सामना करण्याकरिता नद्यांचे प्रवाह जागोजागी अडवणे आणि पाटबंधाऱ्याच्या साहाय्याने तलाव निर्माण करणे हा उपाय आम्ही आजवर करत आलो आहोत. अशा तलावांच्या परिसरात आजवर अनेक नागरी वस्त्या वाढल्या. तसेच रोखीच्या पिकांची शेती आणि कारखानदारीही वाढली. आज अशा अनेक तलावांमधले पाणी हे मनुष्यवस्त्यांतून वाहून येणारा मैला, कारखान्यांचे सांडपाणी आणि शेतजमिनींतून वाहून येणारी रासायनिक खते आणि कीटनाशके यामुळे प्रदूषित होत आहे. याबाबत तज्ज्ञांनी केलेल्या काही अभ्यासांचे निष्कर्ष खरोखर धक्कादायक असेच आहेत. महाराष्ट्रातील काही मानव-निर्मित तलावांचे पाणी हे पिण्यासाठी तर नव्हेच पण सिंचनासाठीदेखील सुरक्षित नाही असे हे अभ्यास दर्शवतात. मग अद्यापही अशाच पाणी-योजना राबवत राहणे हे व्यवहार्य आहे का? येत्या काळात आर्थिक विकास, जैवविविधता, पर्यावरणीय सक्षमता, अन्न-धान्याची उपलब्धता, सार्वजनिक आरोग्य आणि बालसंजीवन ह्या सगळ्या गोष्टी पाण्याच्या उपलब्धतेवरच अवलंबून असणार. त्यामुळे यापुढे पाण्याचा उपसा करण्याच्या मोठ्या योजनांऐवजी त्याच्या पुनर्भरणाच्या योजना राबवणे हे जास्त मोलाचे ठरवणार आहे. देशी तंत्रज्ञान वापरून कमी खर्चाचे छोटे पाणी-विकास प्रकल्प उभे करणे, त्यांच्या नियोजन, उभारणी आणि देखभालीत स्थानिक लोक आणि लाभधारकांचा योग्य सहभाग ठेवणे आणि पाण्याच्या प्रदूषणाविरुद्ध कठोर नियंत्रणाचे उपाय अमलात आणणे, अशा योजनांचा पुरस्कार आपण या पुढच्या काळात करण्याची गरज आहे. शुद्ध पाण्याचे खरोखर काय मोल आहे हे सगळ्या लोकांनाही समजावे म्हणून या बाबत लोकजागृतीचे परिणामकारक उपक्रमही वारंवार हाती घेण्याची गरज आहे.

## सावकार देशांची दंडेलशाही


विकसित देशांनी स्वत:च्या आर्थिक बळाचा वापर करून जगभरच्या निरनिराळ्या राष्ट्रांवर दंडेलशाही गाजवण्याच्या प्रकारांची प्रचिती यापुढे वारंवार येणार यात शंका नाही. सोविएत संघराज्य शाबूत असेपर्यंत अमेरिकेसारख्या आर्थिक महासत्तेला थोडातरी लगाम होता. आता त्यांना मोकळे रान मिळाले आहे आणि सदैव आर्थिक अडचणीत असलेल्या भारतासारख्या अनेक विकसनशील आशियायी देशांना त्यांच्यासमोर मान तुकवावी लागत आहे. ऊर्जानिर्मितीसाठी असो वा खनिज-विकास कामांसाठी, पाणीविकासासाठी असो वा दळणवळणासाठी, अत्यंत अवाढव्य आणि खर्चीक असेच महाप्रकल्प हाती घ्यायचे हा आमचा खास शिरस्ता. अत्याधुनिक तंत्रज्ञान हेच केवळ जास्त फायद्याचे आहे आणि आपले सगळे प्रश्न फक्त अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरानेच सुटू शकतात या ठाम विश्वासाने आमचे तंत्रशहा महागड्या विकास योजनांचाच पाठपुरावा करत असतात. जागतिक बँक किंवा आंतरराष्ट्रीय नाणेनिधी यांच्याकडून अर्थसाहाय्य घेतल्याशिवाय स्वत:च्या बळावर त्या योजना तडीला नेणे आम्हाला शक्य नसते. मग असे कर्ज मागायला आम्ही जातो तेव्हा या सगळ्या जागतिक वित्तसंस्थांच्या आडून त्यांच्यावर नियंत्रण ठेवणारे सधन, विकसित देश आम्हाला अनेक अटी घालतात. कोणत्याही विकसनशील देशाचे स्वत:च्या अर्थव्यवस्थेवर असलेले नियंत्रण उठवणे हा या अटींचा मुख्य उद्देश असतो. अर्थव्यवस्थेचे जागतिकीकरण लादताना प्रत्यक्ष कर कमी करणे; उत्पादन, व्यापार आणि आयातनिर्यात ही जागतिक व्यापार संघटनेच्या नियमांप्रमाणे चालू देणे; परदेशी भांडवलाच्या गुंतवणुकीला अनिर्बंध प्रोत्साहन देणे ह्या गोष्टींची सक्ती होते. देशाच्या आर्थिक व्यवहारांवर त्या देशातल्या सर्वसामान्य, गोरगरीब लोकांच्या, कामगारांच्या, आदिवासी आणि शेतमजुरांच्या कल्याणासाठी केलेल्या नियमांचे बंधन नको, हे जागतिकीकरणातले एक महत्त्वाचे सूत्र आहे. त्याचप्रमाणे एक राष्ट्र-राज्य म्हणून सर्व बाबतीत स्वत:चे निर्णय स्वत: घेण्याचे तुमच्या देशाचे स्वातंत्र्यही या जागतिक वित्त आणि व्यापार संस्था नाकारतात आणि भिकाऱ्यांपुढे काही पर्याय नसतो या उक्तीला जागून आम्हीही त्यांच्या अटी स्वीकारत जातो.

## ही आधुनिकता काय कामाची?

येत्या पंचवीस वर्षांमध्ये भारतात पाणी आणि इतर साऱ्या नैसर्गिक संसाधनांच्या विकासासाठी आणि ऊर्जानिर्मितीसाठी प्रचंड भांडवली गुंतवणूक करण्याची चढाओढच सगळ्या विकसित देशांमध्ये होणार हे उघड आहे. कारण त्यांच्या स्वत:च्या देशात भांडवल गुंतवणे हे आता त्यांना फायदेशीर राहिलेले नाही. संसाधन विकासाच्या अनेक प्रकल्पांसोबत सेवासाधने, दळवळणाची साधने, इलेक्ट्रॉनिक वस्तू, संगणक-संबद्ध वस्तू, प्रक्रियाकृत अन्नपदार्थ, अत्याधुनिक वाहने, अन्य चैनीच्या वस्तू इत्यादींच्या उत्पादनांसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा आणि अफाट परकीय भांडवलाचा वापर यापुढे भारतात केला जाईल. ही गोष्ट आता अपरिहार्यच आहे असे आम्ही म्हणू लागलो आहोत. जागतिकीकरणाला विरोध करणे हे मागासपणाचे लक्षण आहे असेच आता आपल्याकडील अनेक तज्ज्ञ मंडळी मानू लागली आहेत. १९९७ साली जपानमधील क्योटो येथे एक आंतरराष्ट्रीय करार झाला. या करारान्वये जगातल्या सर्व विकसित राष्ट्रांवर काही बंधने घातली गेली. कारखानदारीमुळे वातावरणात सोडल्या जाणाऱ्या हानीकारक वायूंचे प्रमाण वाढू न देण्याबाबत ही बंधने घातली गेली. त्यामुळे हे विकसित देश आता भारतासारख्या सगळ्या विकसनशील देशांमधील कारखानदारी वाढवून त्यांनाही या कराराच्या बंधनांत सामील करण्याचे प्रयत्न करणार हे उघड आहे. ह्या मार्गाने त्यांचे अतिरिक्त भांडवलही गुंतवले जाते आणि व्यवहारांवर त्यांचे संपूर्ण नियंत्रणही राहू शकते. परंतु त्यामुळे विकसनशील देशांमधील नैसर्गिक साधनसंपत्तीची नव्याने लूट होण्याचा मोठा धोका आहे हे आपण ध्यानी घ्यावयास हवे. म्हणून आपल्या विकासासाठी आता विचार करूनच जे काही करावयाचे आहे ते आपल्या नैसर्गिक साधनसंपत्तीच्या मर्यादा जाणून आणि देशाच्या परिस्थितीय अनुकूलतेचा विचार करूनच करायला हवे. त्याचप्रमाणे देशातल्या बहुसंख्य जनतेच्या गरजांचाही विचार प्राधान्याने करावयास हवा. बहुसंख्य लोकांना अन्न-वस्त्र-निवाऱ्यासारख्या मूलभूत गोष्टी पुरवणे, पिण्याचे पाणी देणे, त्यांना साक्षर करणे, रोजगार देणे, आरोग्याच्या किमान सोयी पुरवणे या साध्या गरजाही अद्याप पूर्ण करता आलेल्या नाहीत. अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि परकीय भांडवल गुंतवणूक यांची ह्या गरजा पूर्ण करण्यासाठी जशी गरज नाही, तद्वतच त्यांची इथल्या नैसर्गिक संसाधनांच्या विकासातही गरज नाही. आपल्या लोकांच्या विशिष्ट गरजा ओळखून आणि उपलब्ध संसाधनांचा अंदाज घेऊन विकासाच्या योजनेत या दोहोंशी सुसंगत असे एखादे तंत्रज्ञान उपयोगात आणणे हे जास्त लाभदायक आहे. ह्या तंत्रज्ञानाचा वापर करत असताना त्याच्या लाभ-हानीचे गणित वस्तुनिष्ठपणे तपासत राहणे आणि अशी योजना राबवण्यात अतीव कार्यक्षमता राखणे या गोष्टी महत्त्वाच्या आहेत. मग असे वापरले जाणारे तंत्र जगाच्या नियमांनुसार अत्याधुनिक नसले तरी काही बिघडत नाही. जागोजागच्या लोकांमध्ये असलेले ज्ञान, त्यांचे कौशल्य आणि अनुभवसिद्ध शहाणपण यांचा वापर करून त्या परिसरांत उपलब्ध असलेल्या संसाधनांपासून त्या त्या भागातील लोकांच्या गरजा भागवणे यातच आपला विकास आहे. या विकासासाठी आपली उत्पादनप्रणाली आणि बाजारपेठ राबवणे ही आपल्या समाजाची खरी गरज आहे. ती आयात-निर्यातीसाठी राबवणे हे आपले उद्दिष्ट होऊ शकत नाही. त्याने आपले पर्यावरणही सुरक्षित राहू शकत नाही.

म्हणूनच, विकसनशील देशांमध्ये नफ्याऐवजी लोकांच्या कल्याणाचा विचार करणारी अर्थव्यवस्था आणि नैसर्गिक संसाधनांच्या शोषणाऐवजी त्यांची पुनर्वृद्धी करणारी व्यवस्था राबवणे जास्त लाभदायक ठरेल. अलीकडे देशाच्या विकास धोरणाला आधुनिक तंत्रापेक्षा आधुनिक मूल्यांची चौकट हवी असा आग्रह जगातील साऱ्या विकसनशील देशांमधून उमटू लागला आहे. विकासप्रकल्पांच्या उभारणीत लोकांचे सहभागित्व, लाभांचे समन्यायी वाटप, संसाधनांच्या निरंतरतेची हमी, कार्यक्षमतेची अनिवार्यता आणि परिणामांच्या उत्तरदायित्वाची स्वीकृती ही आधुनिक मूल्ये पायाभूत मानली जावीत असे आता लोक म्हणू लागले आहेत. भारतात ह्या नव्या विचाराची दखल गंभीरपणे घेतली जाईल तो खरोखरच एक सुदिन असेल.

❑❑



# अध्ययन व संशोधनाचा वटवृक्ष ॲकॅडमी ऑफ डेव्हलपमेंट सायन्स

■ विजय साठे

आणीबाणी संपल्यावर देशात ठिकठिकाणी युवक विधायक कार्याला बांधून घेत होते. याच काळात मुंबई विद्यापीठ 'ग्रॅज्युएट व्हॉलंटरी स्कीम' (GVS) राबवत होतं. या योजनेमधून १९७८ साली काही तरुण बाहेर पडले. मुनीर अलावी, दर्शन शंकर, मठपती, श्रीराम, मणी, पालेकर हे त्यामधले काहीजण. त्यांनी एकत्र येऊन रुरल कम्युन्स (RC) नावाचा ग्रामीण विकास प्रकल्प सुरू केला. काही काळानंतर मुनीर अलावी पेण तालुक्यात RCचं काम करू लागला तर दर्शन शंकरने मठपती, श्रीराम, मणी, पालेकर अशा अन्य सहकाऱ्यांबरोबर रायगड जिल्हा, कर्जत तालुक्यातील कशेळे येथून २ कि.मी. अंतरावर असलेल्या 'लालवाडी' येथे ए.डी.एस. सुरू केलं. गमतीनं त्या वेळी ए.डी.एस. म्हणजे 'ॲकॅडमी ऑफ डेव्हलपमेंट सायन्स' न म्हणता 'ॲकॅडमी ऑफ दर्शन शंकर' असं म्हणायचे! दर्शन शंकर पुढे राजीव गांधी पंतप्रधान असताना त्यांच्या सल्लागार समितीमध्ये होता. ए.डी.एस.बरोबर अजूनही तो आहे. त्याने आता बंगलोर येथे पारंपरिक आरोग्य विज्ञान, वनौषधी यावर राष्ट्रीय पातळीचं कार्य सुरू केलं आहे. इकडे १९८१ साली लावलेल्या ए.डी.एस.च्या बीजाने वटवृक्षाचं रूप धारण केलंय. अर्धवेळ, पूर्णवेळ स्वयंसेवक धरून सुमारे १५० कार्यकर्त्यांचा त्यांच्याकडे गोतावळा आहे. वर्षाला प्रशासकीय खर्च अंदाजे वीस लाखांच्या घरात असून विशिष्ट प्रकल्पाचं बजेट वेगळं आहे. सुमारे ८० एकर जमिनीवरील अध्ययन व संशोधनात्मक कार्यावर प्रामुख्याने आधारलेल्या प्रकल्पाचा हा धावता आढावा.

कर्जतच्या आसपासचा भाग हा कातकरी, ठाकूर, महादेव कोळी या आदिवासी लोकांची प्रामुख्याने वस्ती असलेला आहे. कर्जतपासून १६ कि.मी. अंतरावर कशेळे नावाचे गाव आहे.



**वनौषधी प्रकल्प :** अ‍ॅकॅडमीने प्रथम आदिवासींचे प्राथमिक आरोग्य सुधारण्यासाठी वनौषधींचे संशोधन-संवर्धन-प्रचार आणि प्रसार हे कार्य हाती घेतले.

श्री. रामदास पालेकर यांनी स्थानिक डॉक्टर, वैदू, सुईणी यांची मदत घेऊन आजूबाजूच्या गावांना भेटी दिल्या. चई, पाषाणे, टेंभरे, आंबरुंग इत्यादी ५० गावांतून पायी हिंडून माहिती मिळवली. १०० वाड्यांवर जाऊन मांत्रिक, वैदू, भगत यांच्याशी संपर्क साधला. त्यांच्या मनात विश्वास जागवला. त्यांच्याबरोबर जंगलात भटकंती केली. वनस्पतींचे औषधी गुणधर्म त्यांच्याकडून समजून घेतले. सुरुवातीला त्यांना प्रतिसाद मिळाला नाही. परंतु हा माणूस आपल्या भल्यासाठी धडपडतो आहे ही खात्री झाल्यावर आदिवासी त्यांचे मित्र बनले. कर्जत परिसरात असंख्य औषधी वनस्पती आहेत. पालेकरांनी त्यांचा शास्त्रशुद्ध अभ्यास केला. आयुर्वेदातील प्राचीन ग्रंथांचे अवलोकन केले. हे काम करताना 'आयुर्वेद रत्न' ही पदवीही मिळवली. आदिवासींच्या उपयोगात वनस्पतींच्या पान, फळ, साल, मूळ, फूल या भागांचा वापर होतो. अ‍ॅकॅडमीने ते सर्व उपयोग प्रयोगांनी सिद्ध होतात का याचा धांडोळा घेतला.



औषधांबरोबरच वेगवेगळ्या आजारांचाही येथे अभ्यास झाला. अ‍ॅकॅडमीने आपल्या दीर्घ संशोधनातून काविळीवर १७ औषधे, मूळव्याधीवर २१, भुकेच्या संदर्भात २२, जुलाबावर ३६, तर विविध अवयवांच्या रक्तस्रावावर ४६ औषधींचे संशोधन केले आहे. सर्पगंधा, करंज, अडुळसा, गूळवेल इत्यादी वनस्पतींचे महत्त्व तर पाश्चिमात्य देशांनाही पटले आहे.

निसर्गाने दिलेली ही वनस्पती मानव त्याचे मोल न जाणता नष्ट करू लागला आहे. त्याच्याकडे पाठ फिरवू लागला आहे. त्यामुळे ही माहिती प्रयोगाने सिद्ध करून लोकांपर्यंत पोचवावी; लोकांमध्ये आपल्या नैसर्गिक संपत्तीविषयी जागरूकता निर्माण व्हावी; आयुर्वेदाच्या विद्यार्थ्यांनी येथे येऊन अभ्यास करावा, लोकांनी शोभेच्या झाडांबरोबर आपल्या बागेत औषधी वनस्पती लावून त्यांचा उपयोग करून घ्यावा. शेतीकडे आधुनिक दृष्टीने पाहणाऱ्या प्रयोगशील शेतकऱ्यांनी पीक म्हणून वनौषधींकडे पाहावे आणि या क्षेत्रात सतत संशोधन होत राहावे म्हणून गेल्या वीस वर्षांपासून अ‍ॅकॅडमी प्रयत्नशील आहे. त्याचेच फलित श्री. पालेकर, टी. के. श्रीराम आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी उभारलेल्या 'लोकस्वास्थ्य परंपरा वनौषधी उद्याना'त दिसते. सुमारे २० एकरात हे उद्यान बहरले आहे. आयुर्वेदात दिलेले वनस्पतींचे ५० गुण या उद्यानात दिसतात. सुमारे ३०० वनस्पतींची पद्धतशीर लागवड केली आहे. त्यात रुई, बेल, पिंपळी, हिरडा, शाल्मली, अश्वगंधा, सप्तपर्णी, नागकेशर इत्यादी आहेत.

उद्यानात मातृवनस्पती हा विभाग आहे. यात २०० वनस्पतींची लागवड केली आहे. इतरत्र लागवड करण्यासाठी या विभागातून हव्या त्या वृक्षाचे बीज, मूळ, खोड, फांदी, पान किंवा 'मुळाचे पिल्लू' हवे तेव्हा मिळू शकते.

## अ‍ॅकॅडमीतील दवाखाना

वैद्य संजय डाखोरे हे दवाखान्याचे प्रमुख असून त्यांनी आजूबाजूच्या आदिवासींना स्थानिक वनस्पती वापरून औषधे कशी बनवायची हे शिकवले आहे. वैदू मंडळींचाही रोग्यांवर उपचार करण्यासाठी सहभाग घेण्यात येतो. खेड्यातले लोक तर येथे येतातच पण पुण्या-मुंबईकडचे लोकही उपचारासाठी येथे येतात.

## प्रशिक्षणवर्ग

दरवर्षी डिसेंबर महिन्यात अ‍ॅकॅडमी चार दिवसांचा प्रशिक्षणवर्ग आयोजित करते. त्यात इच्छुकांना वनौषधींची माहिती दिली जाते. वैद्य पालेकर व वैद्य डाखोरे यांचे त्यासंबंधी अनेक लेख प्रसिद्ध झाले असून त्यांचे 'टेरेस हर्बल गाईड' हे पुस्तक लवकरच प्रसिद्ध होत आहे.

## ॲकॅडमीचं आकर्षण : बांबू, वेत, सुतारकाम

ॲकॅडमीत तयार होणाऱ्या वेताच्या विविध आकर्षक वस्तू शहरवासीयांना आकर्षून घेतात. विशेषत: सोफासेट, लॅंपशेड व झुले फारच लोकप्रिय आहेत. १९८२ साली संस्थेने बांबू, वेत व सुतारकाम शिकवण्याचे केंद्र सुरू केले तेव्हा त्यामागील हेतू आदिवासींना रोजगार मिळावा व जंगलाचे रक्षण व्हावे हा होता. त्यासाठी आदिवासींचे प्रबोधन ॲकॅडमीने मोठ्या मार्मिकतने केले. त्यांनी सांगितले, 'तू एक आंब्याचं झाड तोडलंस तर एकदाच हजार रुपये घेशील. ते खाऊन संपतील पण त्याची निगा राख आणि दरवर्षी आंबे, कैऱ्या विकून हजार रुपये मिळव. एक बांबू तोडलास तर दहा रुपये मिळतील पण हातभर बांबूची सुंदर वस्तू केलीस तर शंभर रुपये मिळतील.'



आज शेकडो प्रशिक्षित आदिवासी अनेक प्रकारच्या वस्तू तयार करीत आहेत आणि कष्टातून मानाची भाकरी मिळवीत आहेत. १९८९ साली संस्थेने 'स्वावलंबी औद्योगिक व प्रशिक्षण संस्था' ही सोसायटी स्थापन केली. या वर्कशॉपमध्ये ३० कारागीर काम करतात. श्री. मणी मुख्य मार्गदर्शक आहेत. लाकडाचे फर्निचर, दरवाजे, खिडक्या इत्यादी वस्तू मागणीनुसार बनवल्या जातात. वेत कर्नाटक किंवा आसामातून आणावा लागतो. त्यामुळे त्या वस्तू महाग असतात. संस्थेने बांबूकामावरच भर दिला आहे. बांबूकाम शिकविण्याची जबाबदारी पीटर बेकॉस नावाच्या ऑस्ट्रेलियन नागरिकाने स्वीकारली आहे.

## ॲकॅडमीचा रुचकर विभाग

या परिसरात कैऱ्या आणि करवंदे विपुल प्रमाणात उपलब्ध होतात. दिवसभर टोपलीत वाट्यावर कैऱ्या, करवंदे विकण्यापेक्षा संस्थेत कैऱ्या, करवंदे एकदम विकत देणे आदिवासींना आता फायद्याचे पडते. लोणचं, पन्हं, सरबत, मुरंबे, चटणी यांना वर्षभर मागणी असते. सध्या लोणचे विभाग श्री. रमेश मते व गजानन मते पाहतात. या पदार्थांना 'तुंगी प्रॉडक्ट' असे नाव आहे. 'मोरावळा' व 'आवळा कॅंडी' हे दोन वैशिष्ट्यपूर्ण पदार्थही येथे बनतात. साखरेच्या पाकात मुरवून कोरड्या केलेल्या आवळ्याच्या आंबट-गोड फोडी म्हणजे आवळी कॅंडी चॉकलेट. या गोळ्यांना आरोग्यवर्धक पर्याय आहे. याच विभागातर्फे गेल्या वर्षीपासून नाचणीचे पदार्थ (नाचणी सत्त्व, नाचणी माल्ट) तयार होऊ लागले आहेत. डॉक्टरसुद्धा या नाचणी माल्टची लहान मुलांना उत्तम आहार म्हणून शिफारस करतात.

## एक नाविन्यपूर्ण उपक्रम–धान्यकोश

धान्यकोशाचे काम १५० गावांत उभे करणारे श्री. रामनाथ पाचोरे प्रकल्पाचे समन्वयक आहेत. सावकाराच्या दमनचक्रात अडकलेल्या आदिवासींच्या दयनीय परिस्थितीचा आलेखच त्यांनी धान्यकोशाची माहिती देताना रेखाटला. आगोठीच्या दिवसात सगळे धान्य संपते मग सावकाराकडून धान्य उसने आणावे लागते. परतीची अट अशी की ३० किलो धान्य घेतले तर देताना ४५ किलो द्यायचे. शिवाय घरातल्या एक व्यक्तीने सावकाराचे लावणी-कापणीचे काम फुकट करायचे. त्यामुळे ऐन मोसमात स्वत:च्या शेतात काम करणे त्यांना शक्य होत नाही. आलेले धान्यही सावकार वसूल करणार. अशा रीतीने गावेच्या गावे सावकाराकडे अडकून पडली होती. संस्थेच्या कार्यकर्त्यांनी सुरुवातीला चार गावांत धान्यकोश उभारले. प्रथम गरजूंना स्वत:चे धान्य दिले. मुद्दलाची परतफेड दरवर्षी २५ टक्के प्रमाणे करायची असे ठरवले. गावातच कणग्या उभारून हा धान्यकोश साठा ठेवला. पाच लोकांची पंच कमेटी नेमली. देवाणघेवाण, हिशोबाचा व्यवहार स्थानिक लोकांवरच सोपवला. १९८८ पासून सुरू झालेल्या या योजनेत १०० गावांत १०६ धान्यकोश निर्माण झाले आहेत. धान्यकोशातील धान्यसाठा वाढला तर जास्तीचे धान्य विकून रोख पैशाची मदत देणे-घेणे सुरू झाले. धान्यकोशामुळे आदिवासींची लूट तर थांबलीच पण आपल्या शेतात काम करायला त्यांना वेळ मिळू लागला. कातकरी महिलाही या कामात मागे नाहीत. सुमारे १५ गावांत महिलांच्या पुढाकाराने उत्तमपणे चालू असलेले धान्यकोश आहेत.




## अभिनव उपक्रम – भाताच्या जातींचे रक्षण

राजनीती सांगतानाच विदुराने वनस्पतीरक्षणाचे तत्त्वही सांगितले आहे. आज हायब्रीडच्या दिखाऊ फसव्या जमान्यात आपण आपल्या पारंपरिक धान्याच्या उत्तम जाती गमावू लागलो आहोत. स्वाद, सुवास आगळेवेगळे असलेले भाताचे बियाणे मिळवून त्यांचे जतन संस्थेने केले आहे. भाताच्या अनेक जातींचे पुनर्निमाण करून रक्षण करताना मूलनाश हा दु:सह असतो हे तत्त्व त्यांनी पटवून दिले आहे.

या सर्वांविषयी संस्थेचे तरुण प्रमुख श्री. राजीव खेडेकर यांच्याशी बोलताना आदिवासींच्या शिक्षणाबद्दल त्यांनी मूलगामी विचार व्यक्त केले. आज त्यांना मुख्य प्रवाहात आणणारे शिक्षण देऊन आपण त्यांचे जीवन अधिक दु:खी तर करत नाही ना असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. कारण शाळेत जाणारा आदिवासी मुलगा १०वी पलीकडे जाऊ शकत नाही. शाळेत गेल्यानंतर त्यांच्या परंपरागत कौशल्याची कामे त्याला कमीपणाची वाटतात. शिकार, मासेमारी तो नीटशी करू शकत नाही. अर्धवट शिक्षणामुळे नोकरीही मिळत नाही. शाळा शिकलो म्हणून पांढरपेशी जीवन मिळवण्यासाठी त्याची धडपड सुरू होते. परिणामी गळ्यात ट्रांझिस्टर अडकवून, चांगले कपडे घालून ही मुले फक्त शहरात कचरा काढतात अशी दारुण परिस्थिती आहे. तेव्हा शिक्षणतज्ज्ञांनी अतिग्रामीण भागातील आदिवासींच्या शिक्षणाचा पुनर्विचार करावा असे त्यांनी आवर्जून सांगितले.

लालवाडी या ॲकॅडमीच्या कार्याचा परिचय करून घेताना इथे निरलसपणे कामं करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या त्यागाविषयी, त्यांच्या कामातील आत्मीयतेविषयी, निष्ठेविषयी आदर वाटू लागतो.

गावंडवाडी आणि आजूबाजूच्या परिसराचा विकास करायचा, तर पाणलोट क्षेत्रात विकास होणे आवश्यक आहे, हे ओळखून ॲकॅडमीने त्या दृष्टीने योग्य मार्गदर्शन केले. स्थानिक लोकांच्या मदतीने डोंगराळ भागात हजारो चरं खणले. आवश्यकतेनुसार नालबांध, ओघळबांध घातले आणि पावसाचे पाणी अडू लागले. गावामध्येच थांबू लागले. गावाची पावले विकासाच्या दिशेने पडू लागली. गावंडवाडी, चौधरवाडी इथे तलाव बांधले गेले. पाणी आल्यापासून या गावांनी कात टाकली आहे. आज गावातील एक्कावन्न कुटुंबे दारिद्र्य रेषेवर आहेत.

श्री. माधव मठपतींना मी म्हटलं, "तुम्ही इतकी वर्षं नेटाने काम करीत आहात, तुमची खंत काय?" त्यावर ते म्हणाले, "हे बघा, अध्ययन व संशोधनात्मक कामातून लोकआंदोलन उभं राहायला हवं. जनचळवळ निर्माण व्हायला हवी. महिलांचं सक्षमीकरण, सबलीकरण झालं पाहिजे. वनौषधी, पाणलोटक्षेत्र विकासाचं महत्त्व पटलं पण आता शासन म्हणतं या कामासाठी पैसा नाही... दुसरं असं की, संस्थेचा एवढा डोलारा सांभाळायचा त्यासाठीही खूप खर्च यतोय... माणसानं अतृप्तच राहायला हवं म्हणजे तृप्तीच्या दिशने सुरू असलेला प्रवास खंडित होत नाही, हेच खरं." या निमित्ताने ए.डी.एस. जनचळवळ बनो. ए.डी.एस.चे 'Agitation for Deprived Sections' असे नामांतर व्हावे, हीच सदिच्छा व शुभेच्छा!

❑❑

# दशसहस्रेषु एम.बी.शहा

■ विजय बहाळकर

"तुम्ही मुरलीधरला निरोप सांगा, माझ्या पुस्तकाचा हिंदी अनुवाद तुम्हीच करावयाचा आहे. अनेकांनी मजजवळ हिंदी अनुवाद करण्यासाठी ते पुस्तक मागितले पण मुरलीधरच त्याला योग्य न्याय देऊ शकेल असे मला वाटते."


साधनाताई आमटे यांनी भाईंबद्दल व्यक्त केलेला विश्वास सार्थ होता. पु.लं.च्या 'मातृधर्मी सानेगरुजीं'चा हिंदी अनुवाद असो की नरहर कुरुंदकरांचा 'अद्वितीय राजा शिवाजी'चा हिंदी अनुवाद असो, भाईची खास शैली पुस्तकाच्या गाभ्याला यत्किंचितही धक्का लावत नाही. डॉ. रा. चिं. ढेरे यांचे 'लज्जागौरी', डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे यांचे 'हिंदू समाज संघटन आणि विघटन', रजीया पटेल यांचे 'चाहूल' ही सारी पुस्तके हिंदीत अनुवादित करून हिंदी साहित्यात भाईंनी मोलाची भर टाकली आहे.

हिंदी साहित्यात 'संत योद्धा सेनापति बापट', 'भारतीय समाज क्रांती के जनक महात्मा ज्योतिबा फुले', 'राष्ट्रीय एकात्मता का भव्य स्वप्न आंतरभारती', 'पत्रकारिता और साहित्य', 'अनुवाद विज्ञान-स्वरूप और व्याप्ती', यांसारख्या मौलिक ग्रंथांची निर्मिती करून या क्षेत्रात भाईंनी एक विशेष स्थान प्राप्त केले आहे. 'भारतीय समाज क्रांती के जनक म. फुले' या ग्रंथाला राष्ट्रपतीपदक मिळाले.

अमृता प्रीतम यांचे 'रसीदी टिकट' हे गाजलेले आत्मवृत्त भाईंनी मराठीत अनुवादित केले. डॉ. राममनोहर लोहिया यांच्या व्यक्तिमत्त्वाचा परिचय करून देणारे 'अधुरी कहाणी'चे भाईंनी केलेले मराठी रूपांतर विशेष उल्लेखनीय आहे.

भाईंनी संपादित केलेले 'मी आणि बालकवी', 'सत्त्वगुणी', 'गांधी-विनोबांची पत्रे', 'इतिहासाचार्य वि. का. राजवाडे समग्र साहित्य' कुल खंड १३, 'सप्तसिंधू' हे ग्रंथही वाखाणण्यासारखे आहेत. 'संशोधक व श्रीवाणी' ही त्रैमासिकेही भाईंनी संपादित केली आहेत.


भाईंनी केलेल्या साऱ्या साहित्यनिर्मितीला एक विशेष दिशा आहे. त्यांच्या साहित्याला पूज्य साने गुरुजींच्या विचारांचे अधिष्ठान आहे. गुरुजींनी दिलेला आंतरभारतीचा मंत्र ही त्यांच्या साहित्याची प्रेरणा आहे. 'वेदना जाणावयाला जागवू संवेदना' हे त्यांच्या साहित्यनिर्मितीचे ध्येय आहे. भाईंनी केवळ करमणुकीसाठी साहित्यनिर्मिती केली नाही.



माणूस घडविण्याचा ध्यास त्यांच्या साहित्यात दिसून येतो.

महाराष्ट्रातल्या समाजपरिवर्तनाच्या चळवळीत अभ्यासू, विचारवंत व निष्ठावान वक्ता म्हणून भाईंचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. नर्मदा आंदोलनातील कार्यकर्त्यांसमोर असो की आनंदवनात बाबा आमटेंकडून समाजसेवेची प्रेरणा घेण्यासाठी आलेल्या कार्यकर्त्यांसमोर असो भाई आपल्या सळसळत्या अमोघ वक्तृत्वाने सर्वांना चेतविणारच. मरगळ झटकून जोमाने कार्याला लागण्याची प्रेरणा भाईंच्या भाषणातून मिळते हा साऱ्यांचाच अनुभव आहे.

भाईंचे वक्तृत्व म्हणजे एक निर्मळ, स्वच्छ, स्वच्छंदपणे, खळखळ वाहणारा पाण्याचा झरा. मन प्रसन्न करून टाकणारा. कुणाच्यातरी दु:खात, वेदनेत श्रोत्याला विरघळून टाकणारा शब्दांचा बादशहा. भाईंची शब्दफेक अतुलनीय आहे. त्यांनी बोलतच रहावे असे श्रोत्यांना वाटते.



भाईंना हे सारं लेणं मिळालं ते बालपणापासून. भाईंचा जन्म धुळे शहरातील मोहनदास विठ्ठलदास या जुन्या नावाजलेल्या व्यापारी पेढीत झाला. भाईंचे वडील बन्सिलालभाई गुजराथी सर्वोदयी कार्यकर्ते, स्वातंत्र्य-सैनिक. शासनाने स्वांतत्र्य-सैनिकांना दिलेले पेंशन त्यांनी घेतले नाही. भाईंचे काका कांतीलालभाई थोर गुजराथी स्वातंत्र्यसैनिक. खानदेश गांधी बाळूभाई मेहता, साने गुरुजी, विनोबा, काकासाहेब बर्वे यांसारख्या थोर नेत्यांचा सहवास बालपणीच भाईंना मिळाला. लहानपणापासून राष्ट्र सेवा दलाचे संस्कार, यदुनाथजींसारख्या थोर समाज कार्यकर्त्यांच्या समवेत काम करताना त्यांच्यापासून मिळालेली प्रेरणा ही भाईंची जमेची बाजू. डॉ. पु. ग. सहस्त्रबुद्ध्यांनी भाईंना जीवनमंत्र दिला. 'ग्रंथ वाच, ग्रंथ लिही, ग्रंथ सांग'. भाईंनी आपल्या गुरूंचा आदेश शिरसावंद्य मानून त्याच दिशेने आजपावेतो वाटचाल केली. आजपर्यंत भाईंनी जे लिहिले, जे बोलले ते धर्मनिरपेक्षता, समाजवाद, लोहीया-गांधी-विनोबांच्या विचारांचा प्रसार, समाजकारणाशी संबंधित साहित्यनिर्मिती याच वाटेने. या प्रदीर्घ वाटचालीत मान-सन्मानाने अनेक थांबे आले पण यात अडकून न पडता भाईंचा प्रवास सुरूच आहे.

भाईंचे श्रद्धास्थान यदुनाथ थत्ते. यदुनाथजींनी भाईंना मंत्र दिला 'व्यक्ती, ग्रंथ व आंदोलने यावर लिही'. भाईचं निर्भीड व्यक्तिमत्त्व दिसले ते आणीबाणीच्या काळात. आणीबाणीच्या काळात महाराष्ट्रात गाजले ते पुण्याचे 'साधना' साप्ताहिक. यदुनाथ थत्ते यांनी अत्यंत परखडपणे, निर्भीडपणे 'साधना' त्या काळात चालविले. त्याच पावलांवर पाऊल ठेवून भाईंनी धुळ्यात स्वतंत्र 'भारत' दैनिक चालविले. दिवसभर प्राध्यापकी आणि रात्रभर पत्रकारिता हा त्या काळात भाईंचा जीवनक्रम होता. भाईंना त्यांच्या पत्रकारितेची पावती 'डहाणूकर पुरस्कारा'तून मिळाली होती.


राष्ट्र सेवा दलाने पुरोगामी व परिवर्तनवादी विचारांचे व्यासपीठ, महाविद्यालयीन तरुणांसाठी छात्रभारतीच्या माध्यमातून उभे केले. भाई छात्रभारतीचे संस्थापक-अध्यक्ष. भाईंच्या कार्य कुशलतेने महाराष्ट्रभर समाजप्रबोधनाची शिबिरे छात्रभारतीच्या माध्यमातून झाली. विद्यार्थ्यांची अनेक समाजाभिमुख आंदोलने झाली. समाजवादी समाजरचनेचे स्वप्न घेऊन जातिधर्मनिरपेक्ष असे एक मजबूत युवा संघटन 'छात्रभारती' नावाने उभे राहिले ते भाईंच्या चाणाक्ष नेतृत्वातूनच.

आंतरभारती हे साने गुरुजींचे स्वप्न. गुरुजींच्या अधुऱ्या राहिलेल्या स्वप्नाला पूर्ण करण्यासाठी भाईंनी स्वत:ला त्यात झोकून दिले ते यदुनाथजींच्या मार्गदर्शनाखाली. भाईंच्या षष्ठ्यब्दीपूर्ती गौरव समारंभाच्या निमित्ताने धुळ्यात 'आंतरभारती अध्ययन अनुसंधान केंद्रा'ची स्थापना झाली. आंतरभारतीच्या माध्यमातून राष्ट्रीय एकात्मता, हिंदू-

मुस्लिम एकता, बाबा आमटे जीवन व कार्य या विषयांवर देशातल्या विविध प्रांतात भाईंची व्याख्याने झाली.

सोमनाथची आंतरभारती श्रमसंस्कार छावणी व भाई या एका नाण्याच्या दोन बाजू. महामानव बाबा आमटे हे भाईंचे श्रद्धास्थान. गेली ३३ वर्षे अखंडपणे श्रमसंस्कार शिबिरासाठी अथक परिश्रम करणारे भाई महाराष्ट्रात सर्वांना परिचित आहेत. सुरुवातीच्या पाच वर्षांत श्रमसंस्कार छावणीचे संपूर्ण संयोजन आणि कार्यकर्त्यांच्या प्रबोधनाची जबाबदारी भाईंनी अतिशय समर्थपणे पार पाडली.

बाबा आमटेंच्या भारत जोडो यात्रेने भारतात एक इतिहास घडविला. भारत जोडो यात्रेचे महाराष्ट्राचे संयोजन भाईंनी केले. यात्रेतील तरुणांना मार्गदर्शन करणारे भाई, यात्रेतील तरुणांसाठी वाहनाची, जेवणाची, निवासाची व्यवस्था बरोबर झाली की नाही हे आत्मीयतेने पाहणारे भाई त्या काळात भारत जोडो यात्रेशी एकजीव झाले होते.



महाविद्यालयीन सेवेच्या काळात भाईंनी राष्ट्रीय सेवा योजनेचे चार वर्षे नेतृत्व केले. राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत खेडोपाडी श्रमशिबिरांचे आयोजन केले. विद्यार्थ्यांना शारीरिक आणि बौद्धिक, संस्कारांची पर्वणीच या निमित्ताने भाईंच्या माध्यमातून मिळाली. विद्यार्थ्यांकडून ग्रामसफाई, साक्षरता प्रसार, अंधश्रद्धा निर्मूलन इत्यादी समाजप्रबोधनात्मक कार्यक्रम भाईंनी यशस्वीरीत्या करवून घेतले.

'महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभे'चे प्रचारक म्हणून ४५ वर्षांहून अधिक काळ भाई कार्य करीत आहेत. महाराष्ट्र राष्ट्रभाषेच्या प्रथमापासून ते पंडितपर्यंतच्या सर्व परीक्षांसाठी भाईंनी सतत मार्गदर्शन केले, करीत आहेत. पंडित परीक्षेसाठी निबंधसंग्रहांचे संपादनही त्यांनी केले आहे. त्याचबरोबर सभेचे उत्तम प्रशासक म्हणून कार्य केले आहे. १५ वर्षांपासून ते महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभेच्या पुणे नियामक मंडळावर कार्यरत आहेत. नाशिक विभागाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले आहे. महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभे'चे, (पुणे) उपाध्यक्षपदही भाई भूषवित आहेत. 'महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमी'चे सदस्य आहेत.

हिंदी विषयाचे विद्यार्थीप्रिय प्राध्यापक, व्यासंगी प्राध्यापक म्हणून विद्यापीठात भाईंचे नाव आहे. हिंदी त्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे. 'महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभे'च्या प्रचारकार्यासोबतच ३२ वर्षे महाविद्यालयात एम. ए. पर्यंतच्या विद्यार्थ्यांना त्यांनी शिकविले आहे. हिंदी विषयाचे गाईड म्हणून पुणे विद्यापीठात व उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात त्यांनी काम केले आहे. आजपर्यंत १६ विद्यार्थ्यांना त्यांनी पीएच.डी.साठी मार्गदर्शन केले आहे. २० वर्षे पुणे विद्यापीठाचे व ६ वर्षे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे हिंदी अभ्यास मंडळाचे सदस्य म्हणून त्यांनी काम पाहिले. 'यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठा'च्या (नाशिक) हिंदी पाठ्यपुस्तक समितीचे सदस्य आहेत.

हिंदीचे प्राध्यापक असणारे भाई इतिहास-समाज-शास्त्रासारख्या विषयात संशोधनात्मक काम करत असतील हे प्रथमदर्शनी कोणासही पटणार नाही. परंतु धुळ्याच्या 'राजवाडे संशोधन मंदिरा'च्या उभारणीतील त्यांची धडपड आणि तळमळ पाहिली व त्यानंतर त्यांनी तेथे केलेले संशोधनकार्य पाहिले की भाईंचे मोठेपण लक्षात येते. इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांचे साहित्य संपादन करण्याची जबाबदारी भाईंनी यशस्वीपणे पार पाडून मराठी साहित्याचे एक नवीन दालन वाचकांसाठी उघडले. धुळ्याच्या 'का. स. वाणी मराठी प्रगत अध्ययन केंद्रा'चेही डायरेक्टर या नात्याने भाई समर्थपणे कार्य करीत आहेत.

इतकं सारं करूनही राष्ट्र सेवा दलाच्या कामाकडे भाईंनी दुर्लक्ष केलं नाही. सेवा दल सैनिक म्हणून सेवा दलाने

सोपवलेली क्रामं भाई आजही निष्ठापूर्वक करीत असतात. राष्ट्र सेवा दलाच्या बालगोपाळांना सांगावयाचा संस्कार, कथा, युवकांसाठी मार्गदर्शन, सेवापथकाचे कार्यक्रम किंवा श्रमशिबिर असे काहीही असले तरी भाईंवर सोपविलेली जबाबदारी ते पार पाडणारच! भाई राष्ट्र सेवा दलाच्या राज्य कार्यकारिणीचे सदस्यही होते.

भाईंच्या रक्तातच स्काऊट भिनलेले आहे. वचन, नियम आणि शील ही तर भाईंच्या रक्तात बालपणापासून आहेत. म्हणूनच की काय आता भाई धुळे जिल्ह्याच्या स्काऊट कमिशनर पदाची जबाबदारी समर्थपणे पार पाडीत आहेत. मेधाताई पाटकरांच्या नर्मदा बचाव आंदोलनात भाई सक्रिय आहेत.

महाविद्यालयीन युवकांमध्ये प्रेरणादायी ठरलेली उ. म. वि.ने साने गुरुजी जन्मशताब्दी निमित्त आयोजित केलेल्या कर्मभूमी ते जन्मभूमी सायकलयात्रेचे संयोजन भाईंनी केले. साने गुरुजींची कर्मभूमी अंमळनेर ते साने गुरुजींची जन्मभूमी पालगड हा प्रवास ६० विद्यार्थी व १० प्राध्यापकांसमवेत पूर्ण झाला. प्रवासात अंमळनेरपासून पालगडपर्यंत येणाऱ्या बहुतेक सर्व गावांमध्ये साने गुरुजींच्या विचारांची पेरणी भाईंनी त्याच्या अमोघ वक्तृत्वाने केली. 'कुणा ना व्यर्थ शिणवावे, कुणा ना व्यर्थ हिणवावे। समस्ता बंधु मानावे जगाला प्रेम अर्पावे।।' हा गुरुजींचा संदेश घराघरात पोहोचविला. ठिकठिकाणी मुलांसाठी सुरेख कथाकथन केले.



धुळे शहराचे सांस्कृतिक जीवन समृद्ध करणारी, महाराष्ट्रात लोकमान्यता पावलेली, 'मनोरंजन संस्थे'तर्फे (धुळे) आयोजित शारदीय व्याख्यानमाला, महाराष्ट्रातील नामवंत समाजसुधारक साथी एस. एम. जोशी, प्रा. ग. प्र. प्रधान, राजा मंगळवेढेकर, हमीद दलवाई, प्रा. नरहर कुरुंदकर यांची भाषणे या व्याख्यानमालेत झाली आहेत. या व्याख्यानमालेच्या संयोजनात भाईंचा सिंहाचा वाटा होता,

धुळेकरांना केवळ लेखक-साहित्यिक-वक्ता म्हणूनच भाईंचा परिचय नाही, तर भाई हे एक उत्कृष्ट कलाकार, दिग्दर्शक म्हणूनही परिचित आहेत. तीस वर्षांपूर्वी मोहन राकेश यांचे 'आधे-अधुरे' हे तीन अंकी हिंदी नाटक रंगमंचावर आणणे हे एक धाडसच होते. पण भाईंच्या कुशल दिग्दर्शनाखाली हेही साध्य झाले. 'मनोरंजन संस्थेने'ही नाट्यक्षेत्रात विविध प्रयोग केले. 'मनोरंजन संस्थे'च्या बिनीच्या कार्यकर्त्यांमध्ये भाई अग्रेसर होते.

भाईंचे कॉलेज मित्र सांगतात, भाई उत्कृष्ट टेबलटेनिस खेळतात. त्या काळात त्यांनी कॉलेज गाजविले. भाईंनी पुण्यातली मानाची जयकर ट्रॉफी मिळवून वक्तृत्व कलेत आपले स्थान सिद्ध केले. मितभाषी भाईंनी जे ठरवलं ते केलंच. केल्याची प्रसिद्धी केली नाही. मिरवणं तर मुळीचं नाही. त्या काळात भाईंनी आंतरजातीय विवाह केला. आजही समर्थपणे कौटुंबिक जीवन जगताहेत.

भारतीय स्वातंत्र्याच्या रौप्य महोत्सवी वर्षात 'गर्जा जयजयकार' या कार्यक्रमातून स्वातंत्र्यसंग्रामाचा इतिहास बहारदार गीतांच्या माध्यमातून २० कलाकारांच्या साथीने भाईंनी सादर केला. पहिल्या कार्यक्रमाला कविवर्य कुसुमाग्रज उपस्थित होते. चौदा भारतीय भाषांमध्ये २२ कलाकारांनी सादर केलेल्या राष्ट्रीयगीत गायनाचा, हम हिंदुस्थानीचा प्रयोग भाईंनी साकार केला. अनेक शहरांत त्याचे कार्यक्रम झाले.

स्वलिखित साहित्य, अनुवादित साहित्य, संपादित साहित्य, संगीत, वक्तृत्व, समाजप्रबोधन, श्रमसंस्कार, पत्रकारिता, युवकांसाठी विविध कार्यक्रम, अध्ययन, अध्यापन, अंधश्रद्धानिर्मूलन असे भाईंच्या व्यक्तिमत्त्वाचे आणखी कितीतरी पैलू दाखविता येतील.

भाईंचा आणखी एक विशेष म्हणजे त्यांची नित्य प्रसन्नता. सदाबहार भाई कधी दमत नाहीत, थकत नाहीत. थकले तरी दाखवत नाहीत. प्रत्येकाला प्रेरणा देणार, बहोत खुब! बढिया! आगे बढो!

भाई म्हणजे एक ध्येयधुंद वादळ! आपल्या अमोघ वक्तृत्व शैलीने अज्ञानाच्या, अन्यायाच्या अंधाराला झाकून टाकणारा तेजस्वी सूर्य! त्यामुळे तो कधी थकणार नाही, थांबणार नाही, त्याचे अविश्रांत मार्गक्रमण सुरूच राहील.

*थांबला न सूर्य कधी, थांबली न धरा!*
*ध्येयधुंद वादळास, कोठला किनारा!!*

❑❑


# अधोलोकातील क्रांतिकन्या : कुमुद पावडे

■ नरेंद्र बोडके

सुमारे त्रेचाळीस वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. कुमुद सोमकुंवर नावाची अवघी वीस वर्षांची तरुणी 'बॅचलर ऑफ आर्टस्' या पदवीची मालकीण होती. महार समाजात जन्माला येण्याचे परिणाम ज्यांना भोगावे लागले त्या पिढीत जन्माला येऊनही चिकाटीने शिक्षण घेत कुमुदने 'वसंतराव नाईक इन्स्टिट्युट ऑफ आर्ट ॲण्ड सोशल सायन्सेस' या संस्थेतून पदवी तर प्राप्त केली होतीच शिवाय एम.ए.साठी तिचा संस्कृत विषयाचा अभ्यास सुरू होता. त्या वर्षीच्या उन्हाळ्यात मे महिन्याच्या धगधगत्या झळांमध्ये झोपडपट्टीतल्या तिच्या घरी पावडे नावाचे गृहस्थ आले. त्यांचे नाव मोतीराम पावडे. गांधीवादी विचारात वाढलेला एक उच्चवर्णीय कार्यकर्ता कुमुद सोमकुंवरच्या घरी येऊन 'आमच्या शाळेतल्या मुलांना शिकवायला चला' अशी आग्रहाची मागणी करतो हा म्हणजे कहरच होता. ते दलित मुलांसाठी माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळा चालवायचे. कुमुदताईंनी आधी नकारच दिला. 'कुठलेही संस्कार नसलेल्या तळागाळांतल्या मुलांना मी शिकवणार नाही,' असे त्यांनी मोतीराम पावड्यांना बिनदिक्कत सांगून टाकले. पावडे रागावलेच. म्हणाले, 'उच्चवर्णीय असूनही आमच्यातले अनेक लोक महारांना शिकविण्यासाठी आयुष्य वेचतात आणि दलितांत जन्माला येऊनही दलितांना शिकवायला तुम्ही नकार देता?' कुमुदताई शरमल्या. त्यांनी पावड्यांची क्षमा मागितली आणि म्हणाल्या, 'माझी तयारी आहे, पण वडिलांची परवानगी काढावी लागेल.' एखाद्या नवतरुणीने रात्रशाळेत शिकविणे ही कल्पनाही त्या काळी अशक्य कोटीतली होती. त्यामुळे वडिलांच्या परवानगीवरच सारे काही अवलंबून होते. कुमुदताईंचे वडील देवाजीराव सोमकुंवर यांनी एक क्रांतिकारी निर्णय घेऊन त्यांना हे काय करण्याची परवानगी दिली. मानधन न घेता त्या पावड्यांच्या रात्रशाळेत शिकवू लागल्या. एकीकडे एम.ए.चा अभ्यास सुरू होता. नागपूर विद्यापीठात हाही एक अचंब्याचा विषय होता. १९६० साली त्यांना एम.ए.ची पदवी मिळाली. विद्यापीठात त्या पाचव्या आल्या.

पावड्यांशी त्यांचा अनुबंध जुळत गेला आणि अखेर १४ एप्रिल १९६२ रोजी कुमुद सोमकुंवरची कुमुद







पावडे झाली. हीदेखील एक क्रांतिकारी घटना होती. आज २००१ सालीदेखील लग्नाच्या आणाभाका घेणाऱ्या ब्राह्मण मुलाला आणि जाट मुलीला त्यांचे नातेवाईक सार्वजनिकरीत्या फासावर चढवितात ही वस्तुस्थिती आहे. ७ ऑगस्ट २००१ रोजी घडलेली ही घटना सर्व वृत्तपत्रांनी ठळकपणे छापलेली आहे. आंतरजातीय विवाहाला आजही इतका प्रखर विरोध दिसून येतो तर चाळीस वर्षांपूर्वी महाराघरच्या मुलीने उच्चवर्णीय मुलाशी लग्न करणे ही किती धक्कादायक गोष्ट असेल याची कल्पना करून पाहावी. कुमुदताईंचे अवघे आयुष्य अनेक क्रांतिकारी घटनांनी भरलेले आहे. अधोलोकातील ही एक क्रांतिकन्याच आहे. संस्कृतचे त्यांचे अध्ययन ही जशी एक क्रांती होती तसेच त्यांचा आंतरजातीय विवाह हीदेखील एक क्रांतिकारी घटना होती. अमरावतीच्या सरकारी महाविद्यालयात संस्कृतच्या प्राध्यापिका म्हणून १९६२ साली त्या रुजू झाल्या तेव्हा त्यांच्यावर तिहेरी जबाबदारी येऊन पडलेली होती. संस्कृतची प्राध्यपिका या नात्याने आपले करिअर घडवणे, नवऱ्याच्या घरातील कर्मठ वातावरणाला तोंड देत लग्न यशस्वी करून दाखविणे आणि नव्या संसारातील सर्व गोष्टी टिकवून ठेवणे. अशा परिस्थितीतही रात्रशाळेतील अध्यापनाचे काम त्यांनी सुरूच ठेवले. त्या पाच वर्षांच्या काळात तीन मुलांना त्यांनी जन्म दिला. १९६५ साली नागपूर विद्यापीठात बदली झाल्यानंतर पावडे यांच्या 'जवाहर एज्युकेशन सोसायटी' या संस्थेसाठी पुन्हा एकदा त्यांनी विनामूल्य विद्यादानाचे कार्य सुरू केले.

संस्कृतचे अध्यापन, पद्दलितांच्या मुलांसाठी रात्रशाळांमधील अध्यापन, आंतरजातीय विवाह करू इच्छिणाऱ्यांना प्रोत्साहन आणि संरक्षण या कामांबरोबरच कुमुदताईंमध्ये लेखनाची एक उर्मीही निर्माण होत होती. तिला खतपाणी घातले ते त्यांचे वर्गमित्र डॉ. गंगाधर पानतावणे यांनी. गंगाधरराव त्यांच्याच कॉलेजचे विद्यार्थी. कुमुदताई लिहितात हे त्यांना माहीत होते. त्यांनी 'अस्मितादर्श'साठी लिहावे, असा पानतावणे सरांचा आग्रह होता. १९७५ साली 'माझ्या संस्कृतची कहाणी' ही त्यांची आत्मकथा 'अस्मितादर्श'मध्ये प्रकाशित झाली आणि त्यांची गणना महाराष्ट्रातल्या प्रथितयश साहित्यिकांमध्ये होऊ लागली. त्यांच्या लेखनाने हळूहळू स्वत:चा एक आकार धारणा केला. १९८० साली 'अंत:स्फोट' हे त्यांचे स्वानुभवावर आधारित पुस्तक प्रकाशित झाले. अनेकविध मासिकांमध्ये आणि नियतकालिकांमध्ये सामाजिक आणि आर्थिक प्रश्नांवर त्या लिहू लागल्या. १९९० नंतर त्यांनी पूर्णत: दलित स्त्रियांच्या जागरण आणि प्रबोधनकार्यास वाहून

घेतले.




स्त्रियांसाठी काम करताना आणि विशेषत: इतर मागासवर्गीय महिलांसाठी काम करताना समाजातील प्रतिष्ठितांकडून कशी खिल्ली उडविली जाते त्याचेही अनुभव त्यांनी घेतले. एक जुनी घटना त्यांना आठवली. एका कार्यक्रमात मृणालताई गोरे होत्या. प्रसिद्ध साहित्यिक बाबा मोहोडही होते. त्यांनी चक्क जाहीरपणे खिल्ली उडवली. पाटील-देशमुखांच्या बायका पूर्वी डोईवरून पदर घ्यायच्या. कुमुद-ताईंमुळे आता त्या बिघडल्या आहेत, अशी टीका मोहोड यांनी केली. असे सर्व प्रहार झेलतच कुमुदताईंचे काम सुरू राहिले. ज्या 'जवाहर रात्रशाळे'त त्यांनी विनावेत विद्यादान केले त्या शाळेच्या समितीचे अध्यक्षपद सध्या त्यांच्याकडे आहे. १९६२ साली त्यांनी स्वत: अमरावतीत 'ज्ञानज्योती मोफत शाळा' स्थापन करून तीन वर्षे त्या शाळेत शिकवले. १९६२ साली केंद्र सरकारच्या शिक्षण खात्याने पुण्यात भरविलेल्या अखिल भारतीय युवा नेतृत्व शिबिरात त्यांनी नागपूर विद्यापीठाचे प्रतिनिधित्व केले. १९६७-७९ या कालखंडात महाराष्ट्र सरकारच्या सामाजिक शिक्षण मंडळावर मानद सदस्य म्हणून काम केले. १९८० साली उस्मानाबाद येथे भरलेल्या 'अस्मितादर्श' साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी त्यांची निवड झाली. १९८२ साली त्यांनी मुंबईत सामजिक न्याय परिषदेत आपली वैचारिक भूमिका मांडली. नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर संशोधन समितीच्या सदस्यपदी त्यांनी काम केले. राज्य सरकारच्या आग्रहावरून मराठी शब्दकोश समितीवर त्यांनी काम केले. १९८८ साली सांगली जिल्ह्यातील वाळवा येथे भरलेल्या दलित-आदिवासी-ग्रामीण साहित्य संमेलनात त्यांनी सहभाग घेतला. स्त्रियांसाठी काम करणाऱ्या 'बायजा' या मासिकाच्या आजही त्या विश्वस्त आहेत. १९८७ साली महाराष्ट्र शासनाने 'संस्कृत पंडिता' हा किताब देऊन






शंकराचार्यांच्या हस्ते त्यांचा गौरव केला. नागपूर येथील जनसाहित्य सभेच्या संस्थापनात त्यांनी हातभार लावला. १९८७ साली महाराष्ट्र सरकारच्या माहिती खात्याने गोव्यामध्ये त्यांची चार व्याख्याने ठेवली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. अ. का. प्रियोळकर या अभ्यासकांवर त्यांची व्याख्याने झाली. 'अंत:स्फोट' हे त्यांचे पुस्तक डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या एम.ए.च्या अभ्यासक्रमात अंतर्भूत करण्यात आले आहे.

कुमुदताईंच्या कार्याचे स्वरूप चौपेडी आहे. एकीकडून अध्यापन करीत करीत त्या समाजातील तळागळांतील स्त्रियांमध्ये आत्मविश्वास निर्माण करतात. दुसरीकडून समाजातील उच्चस्तरीय वर्गामध्ये व्याख्याने देऊन दलितोद्धारास पोषक अशी भूमिका निर्माण करतात. तिसरीकडून विविध सरकारी संस्थामार्फत विकासकार्याला चालना देतात आणि चौथीकडून स्वयंसेवी संस्थांची उभारणी करीत आपण मांडत असलेल्या विचारांना कृतीची जोड देतात. स्वयंसेवी संस्थेच्या व्यासपीठावरून काम करता यावे यासाठी 'ऑल इंडिया प्रोगेसिव्ह वुमेन्स ऑर्गेनायझेशन' ही संस्था आता त्यांना उपलब्ध आहे. सुगंधाबाई शेंडे अध्यक्ष आहेत. 'या संस्थेमार्फत आता खेडोपाड्यांत दलित स्त्रियांना बोलत करणं हे काम मी आता स्वीकारलं आहे', असे त्यांनी सांगितले. वरवर पाहता हे साधं वाटतं, परंतु अन्यायाने पिचलेल्या आणि परंपरेने जेरबंद केलेल्या स्त्रियांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणे ही सोपी गोष्ट नाही. कुमुदताईंचे असे म्हणणे आहे की, 'या स्त्रियांमध्ये आत्मविश्वास निर्माण केल्याशिवाय त्यांचा विकास होणे अशक्य आहे.' वेगवेगळी सरकारी खाती, कलेक्टर कार्यालय, तलाठ्याचे कार्यालय अशा ठिकाणी आपला मुद्दा कसा लावून धराचा, आपल्याला हवं असलेलं प्रमाणपत्र कसं मिळवायचं, त्यासाठी कुणाशी कसं बोलायचं यासाठी प्रशिक्षण देणारी शिबिरे त्यांच्या संस्थेमार्फत घेतली जातात. या संस्थेला आता २५ वर्षे पूर्ण झाली आहेत. ग्रामीण भागात पाव शतक अथक काम केल्यामुळे पितृसत्ताक कुटुंबरचना, जातिव्यवस्थेच्या रूढी आणि स्त्री म्हणून मिळणारी दुय्यम वागणूक असे हे तिहेरी जंजाळ भोवती असूनही दलित स्त्रिया बोलू-लिहू लागल्या आहेत.

कुमुदताईंनी आता एक नवीन प्रकल्प हाती घेतलेला आहे. अजनी येथील 'कुकडे ले-आऊट'मध्ये संस्थेला ऐसपैस जागा मिळालेली आहे. तिथे एक मोठे संकुल उभारण्याचा संकल्प त्यांनी सोडला आहे. या सर्व भागात प्रामुख्याने दलित वस्त्या आहेत. तिथे स्त्रियांसाठी



रोजगारनिर्मिती करता यावी, यासाठी डिपार्टमेंटल स्टोअर उभारले जाणार आहे. तिथे विकला जाणारा माल स्थानिक स्त्रियांनीच उत्पादित करावयाचा, अशी कल्पना आहे. त्याशिवाय संस्था स्वावलंबी व्हावी म्हणून लग्नाचा एक हॉल तिथे उभारला जाईल. 'प्रौढ शिक्षण केंद्र,' 'बाल संस्कार केंद्र,' 'बाल नाट्यगृह' असे अनेक प्रकल्प तिथे राबविले जातील. आर्थिक, सांस्कृतिक आणि सामाजिक स्तरांवर काम करून नवी जाणीव विकसित केली जाईल. जागृती आणि प्रबोधन यांची सांगड घालून विधायक उपक्रम उभे केले जातील. तळागाळांतील स्त्रियांसमोर आजही कौटुंबिक समस्यांचे प्रमाण भेडसावणारे आहे, असे निरीक्षण त्यांनी नोंदवले. नागपूर-जवळ भानखेडा गावात मुस्लिम, कोष्टी, बौद्ध समाजांच्या वस्त्या आहेत. पुरुष व्यसनाधीन आहेत. त्यांना गर्तेत बुडविण्यासाठी दारूच्या भट्ट्या लावल्यात जातात.




अतिरिक्त दारू प्यायल्यामुळे हिंसक प्रवृत्ती वाढीस लागते. त्यामुळे या भागात काम करताना या भट्ट्या पाडून टाकणे हे एक प्रमुख उद्दिष्ट असते. कुमुदताई आपल्या सहकाऱ्यांसह या भट्टीसंहार मोहिमेवर निघतात. अनेकदा गुंडांशी सामना करावा लागतो, पण त्यासाठी नैतिक बळ त्यांना अंत:स्फूर्तीने मिळते.

कुमुदताईंचे घर म्हणजे कार्यकर्त्यांची भरपूर उठबस असलेली एक चावडीच म्हणावी लागेल. त्यांचं कुटुंब हीच एक संस्था आहे आणि त्यांच्या संस्था हेही एक कुटुंबच आहे. त्यांची तिन्ही मुलं अपूर्व, अभिजित आणि अमिताभ डॉक्टर आहेत. अपूर्व आणि त्याची बायको नागपूरच्या मेडिकल कॉलेज-मध्ये आहेत. अमिताभ 'एअरपोर्ट ॲथॉरिटी ऑफ इंडिया'मध्ये कार्यकारी अभियंता होता पण ती नोकरी सोडून त्याने नरखेड जवळच्या भेटला गावात शेती आणि ग्रामसुधाराला वाहून




घेतले आहे. घरात सगळे गांधीवादी वातावरण, साधेपणा आणि सगळी माणसे एकमेकांशी अकृत्रिम आपलेपणाने जोडली गेलेली. तिथेच उमाताईही–ग.त्र्यं.माडखोलकरांची सून–आलेल्या होत्या. उमाताईंनी एकेकाळी मोतीराम पावडे यांच्या शाळेत शिकवलेले आहे. पावडे यांनी १९५८ साली सीताबर्डीवर मोफत रात्रशाळा आणि महाविद्यालय सुरू केले तेव्हा भाऊसाहेबांनी स्वत: 'तरुण भारत'मध्ये अग्रलेख लिहून त्या उपक्रमाचे स्वागत केले होते. मधुकर देशमुख आणि मोतीराम पावडे यांची पाठ थोपटली होती. त्या शाळेत शिक्षिका म्हणून कुमुदताई आल्या आणि घरच्याच झाल्या. एका संस्थेतून एक कुटुंब फुलले. त्या कुटुंबातून अनेक संस्था उभ्या राहिल्या. एखाद्या आधारवडासारखे पावडे कुटुंबाचे घर तिथे वसले आहे. मोतीराम आणि कुमुदताई म्हणजे २१ व्या शतकातील मोहनदास आणि बा असंच म्हणावं लागेल. काही माणसे अशी असतात की, जी पुरस्कारांनी मोठी होत नाहीत तर उलट पुरस्कारांनाच त्यांच्यामुळे मोठेपण प्राप्त होते. ४३ वर्षांपूर्वी ग. त्र्यं. मोडखोलकरांनी मोतीराम पावडे यांची पाठ थोपटली. आज न्यूयॉर्कवरून सुनील देशमुख 'महाराष्ट्र फाउण्डेशन'च्या वतीने कुमुद पावडे यांना सन्मानित करीत आहेत. एक कालचक्र पूर्ण झालेले आहे. कुमुदताईंना सन्मानित करून 'महाराष्ट्र फाउण्डेशन' या संस्थेलाच एक झळाळी प्राप्त झाली आहे.

❑❑




# काळुरामकाकाची भूमिसेना

■ प्रतिमा जोशी

त्याचं नाव काळुराम दोधडे असलं तरी तसे त्याला सारे काळुरामकाका म्हणूनच ओळखतात आणि वय आता ६४ झालं असलं तरी त्याचा उल्लेख 'अरे काळुराम' असाच केला जातो. अर्थात त्यामागं आपुलकी असते. मित्रत्वाची भावना असते हे काळुरामकाकालाही माहीत आहे. त्याची त्याबद्दल तशी काही तक्रारही नाही. मोकळ्याढाकळ्या, सभ्यपणाचे तकलादू नियम नसलेल्या आदिवासींचा तो एक रांगडा नायक आहे. भूमिपुत्र आहे.

त्याची काही तक्रार नसली, तरी त्याला काही म्हणायचं मात्र आहे. तो असं म्हणतो की, वरवर सुसंस्कृत असणाऱ्यांच्या मनातही एक उतरंड असते. या उतरंडीत दलित, आदिवासी वगैरे 'आपल्या'त जमा न होणाऱ्यांना त्यांच्या वयाचाही विचार न करता सहजपणं एकेरी संबोधलं जातं. त्यांचा सामाजिक दर्जा हा खालचाच असतो. त्याला नेतृत्वाची जबाबदारी पेलता येईल किंवा कसं याबाबत मनात नाही म्हटलं तरी संशयाची पाल चुकचुकत असतेच. शिवाय कशाला काय म्हणयचं हेही ठरवणारे लोक उच्चवर्णीयच. त्यामुळं त्यांच्या गणिताच्या भाषेत नापास होणाऱ्यांच्या क्षमतेबाबत प्रश्नचिन्हं राहतात.

दलित-आदिवासींनी फक्त आंदोलनाचं संख्याबळ सांभाळायचं असतं. त्याला दिशादिग्दर्शन करण्याचं काम 'सुशिक्षित' मंडळीचं! प्रगत पांढरपेशे आदिवासींना मागास समजतात. पण आपणापाशी असलेल्या कित्येक चांगल्या गोष्टींशी पांढरपेशे समाज स्पर्धाच करू शकत नाहीत, असं त्याला मनोमन वाटतं. वर्चस्ववादी आणि विषमतेला पूर्ण वाव देणाऱ्या व्यवस्थेशी असलेली नाळ पूर्णपणे तोडणं कठीण असतं याबद्दल त्याला पक्की खात्री आहे. परिवर्तनवादी संघटनांमध्ये गेल्या काही वर्षांत उच्चवर्णीयांचं नेतृत्व नाकारणारी, 'आमचं नेतृत्व आम्हीच करणार' अशी एक ठाम भूमिका घेतली जाऊ लागली आहे. त्याला कडवेपणाचा वास येतो अशी कुरकूरही दुसऱ्या बाजूनं कानावर येत असते. जातिविरहित समाज घडवण्याच्या कामात कार्यकर्त्यांची जातीवर आधारित विभागणी करणं अयोग्य आहे असंही म्हटलं जातंय. पण काळुरामकाकासारखे कार्यकर्ते आपल्या 'आमचं नेतृत्व आम्हीच करणार' या भूमिकेपासून तसूभरही हटायला तयार नाहीत. गेल्या अनेक वर्षांच्या अनुभवांतून तो या पक्क्या विचारांपाशी थांबलेला आहे. तो हे सगळं मांडतो, पण त्याच्या गप्पाळ आणि गोष्टीवेल्हाळ



शैलीत त्याला आपलं म्हणणं 'मांडता' वगैरे येत नाही. त्याच्या एकूण व्यक्तिमत्त्वाशी हे साजेसंच आहे.

काळुरामकाकाची वाटचाल बारकाईनं पाहिली, तर या ठाम भूमिकेपाशी तो नव्यानं आला आहे असं मात्र म्हणता येणार नाही. आदिवासींचे लढे लढवताना त्याला सततच हे जाणवत आलं आहे की जे आपले जन्माचे भोग आहेत, ते डाव्या म्हणवल्या जाणाऱ्यांच्या दृष्टीनं 'इश्यू' आहेत. अनेक इश्यूंपैकी एक!

आदिवासींचं जगण्याचं साधन असलेली जंगल-जमीन आणि जलसंपत्ती यांना इंग्रजांनी फॉरेस्टखात्याच्या ताब्यात देऊन क्रयवस्तू बनवलं आणि आपल्याच घरा-अंगणात, शेत-शिवारात आदिवासी परका, घूसखोर बनला. मालकाचा मजूर झाला. आत्मनिर्भरतेकडून वेठबिगारीकडे प्रवास सुरू झाला. पुढे भारताला स्वातंत्र्य मिळालं म्हणून हा प्रवास संपला असं झालं नाही. उलट गोऱ्यापेक्षा काळा साहेब अधिक बेमुर्वत निघाला. विकासाच्या नावाखाली आदिवासींची साधनसंपत्ती ओरबडण्यात देशी साहेब ब्रिटिशांपेक्षाही दोन पावलं पुढंच गेले. विकासाच्या कल्पनाही तथाकथित उच्चवर्णीयांच्या चौकटीतल्या आणि पुनर्वसनाच्या व्याख्याही त्यांच्याच फायद्याच्या! आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक बँक यांच्या कह्यात जाऊन त्यांनी लादलेली आर्थिक धोरणं राबवणाऱ्या सरकारनं घटनेतल्या पाचव्या अनुसूचीच्या आधारे नैसर्गिक साधनसंपत्तीवर आदिवासींचा जो काही उरलासुरला अधिकार होता त्यावरही आक्रमण केलं आहे. आदिवासींची जमीन बिगरआदिवासींनी खरेदी करण्यावरील निर्बंध उठवून आदिवासीचं नामोनिशाण राहणार नाही असं कारस्थान रचलं जातंय. सतत विस्थापन, स्थलांतर, असंघटित क्षेत्रातले मजूर बनणं हेच आता आदिवासींचं आयुष्य बनलं आहे. जी राज्यं ब्रिटिश काळात खरोखरच पूर्णत: आदिवासी राज्यं होती, तिथं आता एकूण लोकसंख्येच्या एकतृतीयांशच आदिवासी उरले आहेत. आदिवासींच्या संस्कृतीवरही मोठ्या प्रमाणात अतिक्रमण सुरू झालं आहे. वनौषधींचा प्रभावी वापर करणारा आदिवासी मागास ठरला आणि त्याच औषधींवर आधारलेल्या आयुर्वेदाचा उल्लेख मात्र भारताची गौरवशाली परंपरा म्हणून केला जातोय. भाषेच्या आधारे राज्यांची रचना करतानाही भिल्ल, गोंड आणि इतर आदिवासी जमातींचे तुकडे केले गेले. राजस्थानचे भिल्ल मध्य प्रदेशातल्या भिल्लांशी संपर्क साधू शकत नाहीत. त्यांच्यावर त्या त्या राज्यांच्या भाषा लादल्या गेल्या आहेत. मूळ गोंडी किंवा कुडूखसारख्या भाषा नाहीशा होण्याच्या मार्गावर आहेत आणि भाषेबरोबरच मौखिक परंपराही इतिहासजमा होऊ लागल्या आहेत.



काळुरामकाका म्हणतो, एका बाजूनं महाराष्ट्रात आम्ही मराठी नाही, गुजरातेत गुजराती नाही, ओरिसात उडिया नाही आणि दुसऱ्या बाजूनं आमची संस्कृती, भाषा वेगळी असूनही आम्हाला स्वतंत्र राष्ट्रीयतेचा दर्जा नाही. ज्या देशाचे आम्ही मूळ निवासी आहोत, त्या देशात आम्ही दुय्यम नागरिक झालो आहोत.

गेली काही वर्षं आणखी एका मोठ्या आक्रमणाला आदिवासी तोंड देत आहेत. 'विश्व हिंदू परिषद', 'बजरंग दल', 'वनवासी कल्याण आश्रम' यांसारख्या हिंदुत्ववादी संघटनांचं भगवं आक्रमण आदिवासींचं उरलंसुरलं अस्तित्वच पुसायला निघालं आहे. डांगमध्ये आदिवासींचं जबरदस्तीनं हिंदूकरण, धर्माच्या नावानं आदिवासींत यादवी लावून देणं, नंदूरबार जिल्ह्यात आदिवासींच्या परंपरागत देवतेची—देवमोगरा हीची—जगदंबेच्या नावानं यात्रा काढणं, आदिवासी हे हिंदूच आहेत अशा पुस्तिका काढणं आणि कहर म्हणजे या मूळ निवासीला वनवासीचा दर्जा बहाल करणं, या देशावरचा आदिवासींचा हक्क मोडीत काढणं.

काळुरामला वाटतं की या सगळ्या युद्धसदृश्य स्थितीतही

कथित सेक्युलर आणि डाव्यांचं राजकारण आघाड्यांच्या राजकारणापलीकडं जायला मागत नाही. जिथं आक्रमक व्हायला हवं, तिथं डावे फक्त प्रतिक्रिया देताहेत. अशा प्रतिक्रियावादी राजकारणाचं एक कारण त्याचं नेतृत्व तळागाळांतल्या समाजातून आलेलं नसणं! आणि दुसरं अर्थात त्यामुळंच वर्तमानाची आव्हानं न ओळखण्याची गल्लत करणं!!

काळुरामकाकाचं एक वैशिष्ट्य म्हणजे तो मनातलं उघड बोलून दाखवायला कचरत नाही. त्याचे विचार आणि मतंही पक्की असतात आणि कोणाबद्दल काही तक्रार असली तरी व्यक्तिगत पातळीवर त्याचं कोणाशीच शत्रुत्व नसतं. त्यामुळंच तो बेधडक बोलत जातो आणि कधी कधी माणसं दुखावली जातात. अनेकदा दुरावलीही जातात. चळवळी, नेतृत्व याबाबत बोलताना तो पटकन बोलून जातो. कष्ट आणि आदिवासींत मिसळून जाणं यात मेधाताई गोदूताईच्या पुढे चार पावलं आहे, पण ताईच्या चळवळीत बोलकं नेतृत्व आणि दुसरी फळी आदिवासींची नाही... त्याचा रोख पुन्हा एकदा पुरोगामी चळवळीतल्या सदोष संघटनाबांधणीकडं असतो. काळुरामकाकाला वाटतं की सर्वच पक्षांत ही सवर्ण मानसिकता कमी-अधिक प्रमाणात असते. तो मुळात अगदी अलीकडेपर्यंत लोकशाही समाजवाद्यांबरोबर राहिला. त्यामानानं ही मंडळी तुलनेनं अधिक 'मोकळी' आहेत असं त्याला वाटत असावं, अशी शंका त्याच्याशी बोलताना येत राहते. 'जंगल कामगार सोसायटी'च्या कामापासूनच त्याला हे जाणवत आलं आहे. जंगल ठेकेदारांपासून आदिवासींची मुक्तता करण्याच्या हेतूने ठाणे जिल्ह्यात सर्वप्रथम कोंढाण येथे 'आदिवासी जंगल कामगार सहकारी' संस्था स्थापन झाली. त्यापाठोपाठ ठाणे जिल्ह्यात ८२ 'जंगल कामगार सहकारी संस्था' स्थापन झाल्या. त्या काळात आदिवासी समाजात शिक्षणाचं प्रमाण नव्हतंच. या संस्थांतला सर्व कारभार बिगर आदिवासी पाहत. काळुरामकाकानं शाळा सोडल्यावर काही काळ या सोसायट्यांसाठी तक्रार-अर्ज लिहिण्याचं काम केलं होतं. हे काम करताना त्याला जाणवलं की, आजूबाजूला अत्याचारांचा कहर चाललेला आहे, मात्र सोसायट्या याबाबत काही बोलत नाहीत. हे जे काही काम चाललंय ते जुजबी आहे. आदिवासींच्या शोषणाविरुद्धची चळवळ करण्यास त्या असमर्थ आहेत. खरं तर असं काही काम करणं हे त्यांचं उद्दिष्टही नाही आणि मुळात या शोषणाची त्यांना काही जाणीवही नाही. खरं तर या कामात अनेक ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक होते. पण काँग्रेसचा दृष्टिकोण कल्याणकारी आणि सत्ता राबवण्यास पूरक पावलं उचलण्याचा आहे याचे भरपूर पुरावे काळुरामपाशी जमा होत राहिले. केवळ काही आदरणीय व्यक्तींवरील प्रेमापोटी असल्या वरवरच्या कामात कसं सहभागी होता येणार होतं?

मात्र या सोसायट्यांच्या कामामुळं काळुरामकाकाला असंख्य तरुणांपाशी पोचता आलं. जिल्ह्यात सर्वत्र त्याला तरुणांशी संपर्क साधता आला. त्याचा पुढे त्याला भूमिसेनेच्या बांधणीसाठी खूपच उपयोग झाला. एका बाजूला काँग्रेसचा प्रभाव आणि दुसऱ्या बाजूला लाल बावट्याचा संघटित मोर्चा अशा परिस्थितीत काळुरामकाकानं हाताशी पैसा नसताना, कोणाचं विशेष पाठबळ नसताना यातूनही भूमिसेना उभारली ती आदिवासींच्या सततच्या संपर्कामुळं आणि त्याच्याकडं येणाऱ्या झोप उडवणाऱ्या अत्याचारांची प्रकरण नेटानं लावून धरल्यामुळं.

काळुरामकाकानं लढवलेले लढे पाहिले तर त्याचा वेगळेपणा समजतो. १९६८-१९७१ या काळात वनजमिनीवरील आदिवासींची 'अतिक्रमणं' हटवण्यासाठी वनखात्यानं पिकांचा नाश करणं, ॲसिड टाकणं असे प्रकार सुरू केले होते. या काळात राजकीय पक्षांची उदासीनता आणि त्यांना काम करायला लावण्यासाठी उठवायला लागलेलं रान काळुरामला अजूनही आठवतं. १९६९च्या भूमिमुक्ती आंदोलनादरम्यान काळुरामचा निश्चय पक्का झाला. त्यानं आपल्या आदिवासी भावाबहिणींना जमवलं आणि स्पष्टपणं सांगितलं, 'जमीन पाहिजे असेल, तर भीती घालवली पाहिजे, जेलमध्ये जाण्याची तयारी ठेवली पाहिजे. स्वत:चं काम सोडून मोर्च्यात यायला लागेल आणि न घाबरता पोलिसांना उत्तरं द्यायला शिकावं लागेल!' स्वातंत्र्य मिळालं तरी गावागावांत सावकारांचं राज्य होतं आणि पोलिसांच्या वेषात दडपशाहीच मुक्तपणं वावरत होती अशा काळात मुकपणे अत्याचार सहन करणाऱ्या आणि आधुनिक जगाचं वारंही न लागलेल्या आदिवासींना संघटित करणं हे आव्हान तर होतंच, पण स्वत:च लढाऊ राजकारणाचे धडे आपल्या वागण्यातून घालून देणं ही काळाची गरज होती. काळुरामकाका या कसोटीला पुरेपूर उतरला. त्याचा पहिलाच लढा चिल्हेरचा. आदिवासींच्या जमिनी बळकावून त्यावर शेती करणाऱ्यांच्या शेतातली उभी पिकं कापण्याचा निर्णय प्रत्यक्षात आणताना काळुरामला पुढच्या वाटचालीचं प्रात्यक्षिकच करून दाखवावं लागलं. कायदा आपल्या बाजूनं आहे आणि आपण जर मोठ्या संख्येनं जमा झालो, तर पोलिसांचंच काय, पण सरकारचंही काही चालणार नाही हे आदिवासींच्या लक्षात यायला हा लढा कारणीभूत ठरला.





ही चळवळ ठाणे जिल्ह्यात पसरली. काळुरामकाका सांगतो, 'त्या वेळी आदिवासी जमीन हस्तांतर कायदा नव्हता तरी आम्ही कायदेशीर-बेकायदेशीर हस्तांतरित जमिनी सावकाराकडून काढून घेतल्या. पालघराशिवाय डहाणू, जव्हार, वाडा या भागातल्या लोकांनाही चळवळीच्या रेट्याखाली जमिनीचा पिकासहित कापूसकब्जा मिळवला.' या आंदोलनामुळंच कूळ कायदा ३२-आर जमिनीची सर्व महाराष्ट्रभर चौकशी झाली. आदिवासींच्या हस्तांतरित जमिनींच्या प्रश्नावर शासनानं 'भाऊसाहेब वर्तक कमिटी' नियुक्त केली. या कमिटीच्या शिफारशींमुळं शासनाला आदिवासी हस्तांतरित जमीनविषयक दोन कायदे करावे लागले.

भूमिसेनेच्या लढ्यांचं वैशिष्ट्य म्हणजे केवळ आक्रमक पवित्रे आणि आगखाऊ भाषणं नव्हेत. अतिक्रमणाची आणि अत्याचारांची प्रकरणं शक्य तेवढ्या लवकर निपटून काढणं आणि पुन्हा पुढच्या प्रश्नांना हात घालणं याशिवाय काळुरामकाकाचं जमतच नाही. १९७२च्या सुमाराला प्रांत अधिकाऱ्यांकडं ३२-आरनुसार केलेल्या केसेसच्या सुनावणीसाठी भूमिसेनेला डहाणू येथे बोलावलं गेलं. भूमिसेनेला येथे सारखं सारखं जाणं अवघड असल्याचं स्पष्ट झाल्यावर मनोर येथे चौकशी घेण्याचं ठरलं. अशा केसेसचा निकाल १०-१२वर्ष लागत नाही असा तोपर्यंतचा संघटनेचा अनुभव असल्यानं काळुरामकाका आणि त्याचे सहकारी फारसे तयार नव्हते. प्रथम १० केसेस नमुना म्हणून घ्यायच्या ठरलं. प्रत्यक्षात एका दिवसात सर्व केसेसचा निकाल लागला. त्यानंतर भूमिसेनेनं सहकार्य देण्याचं ठरवलं आणि तीन दिवसांत ८०० केसेसचा निकाल लागला, पैकी ७९९ केसेस आदिवासींच्या बाजूनं लागल्या.

वाडा तालुक्यातील इनामी जमिनीचा लढा भूमिसेनेने दोन वर्षं लढवला. आदिवासी कुळांना सावकारांच्या गुंडांची दहशत आणि पोलिसांची दडपशाही अशा दुहेरी अत्याचारांना तोंड द्यावं लागत होतं. आपलीच जमीन असून सावकारांची मनमानी सहन करणाऱ्या आदिवासींवर गोळीबार करण्यापर्यंत परिस्थिती चिघळली होती. हा खटला सेशन्स कोर्टात ३१ दिवस चालला. अखेर निकाल भूमिसेनेच्या बाजूनं लागला. महाराष्ट्रातल्या इनामी जमिनीचा लढा यशस्वीपणं चालवण्याचा मान भूमिसेनेकडंच जातो.

भूमिसेनेनं अनेक लढे लढवले. पण १९७८-१९७९या कालावधीतील 'जबरन जोत आंदोलन' हा संघटनेच्या

आणि महाराष्ट्रातीलही भूमीसुधार प्रक्रियेतील एक मोठा आणि महत्त्वाचा टप्पा म्हणावा लागेल. जमिनीवरून ज्यांना बेदखल करण्यात आलं होतं असे आदिवासी जंगलातल्या ठेकेदारांनी झाडं तोडल्यामुळं ओसाड पडलेल्या जमिनीवर जवळपास २०-२५ वर्षं लागवड करत होते. खूप मेहनत घेऊन या ओसाड जमिनी आदिवासींनी उपजाऊ बनवल्या होत्या. या जमिनींवर बड्या शेतकऱ्यांचा डोळा होताच. या संघर्षात आदिवासींना जमिनीचा हक्क मिळावा यासाठी अनेक संघटना मिळून आंदोलन छेडलं गेलं. या चळवळीचा परिणाम म्हणून डिसेंबर १९७८ मध्ये वनजमिनींवरील अतिक्रमणं नियमित व्हावीत म्हणून शासनानं आदेश काढला. पण त्यात अनेक त्रुटी होत्या. त्या दूर व्हाव्यात म्हणून अन्य सहभागी संघटनांसह भूमिसेनेनं सत्याग्रह आणि मोर्च्यांचा दणका उडवून दिला. डिसेंबर १९७८च्या आदेशात १२ सप्टेंबर १९७९ रोजी नवा आदेश काढून सुधारणा करण्यात आली. १९७२ ते १९७८ या काळात लागवड करणाऱ्या लागवडधारकांच्या जमिनी नियमित करण्याचा निर्णय झाला. पण शासनानं निर्णय दिला म्हणजे प्रश्न सुटला असं कधी होत नाही हे कटू सत्य महाराष्ट्रात चळवळी करणाऱ्यांच्या चांगलंच अंगवळणी पडलेलं आहे. 'जबरन जोत आंदोलनाचं'ही तेच झालं. शासनानं कागदावर मागण्या केल्या म्हणून त्या राबवल्या पाहिजेत याचं गांभीर्य नोकरशहांना फारसं नसतं आणि बड्या शेतकरी-उद्योजकांना कायदे आपल्याही लागू होतात हेच मुळात अमान्य असतं असा हा विदारक अनुभव कायमच येत असतो. या आंदोलनानंतरही आदिवासींवर खोट्या केसेस घालणं, दंड ठोठावणं यांसारखे प्रकार चालूच राहिले. जवळपास पुढली सहा-सात वर्षं लढा चालूच राहिला. न्यायाची एक एक पायरी चढत अखेर सर्वोच्च न्यायालयात झगडावं लागलं. अखेर आदिवासी प्लॉटधारकांच्या बाजूनं निकाल लागला.



काळुरामकाकाच्या प्रत्येक आंदोलनाबाबत लिहायचं तर कुठं थांबायचं असा प्रश्न पडावा. पण काळुरामकाकाचं कार्यकर्ता म्हणून वर्तमानाचं भान नजरेआड करून चालणार नाही. महाराष्ट्राच्या औद्योगिकीकरणाच्या पहिल्या टप्प्यात मुंबईच्या जवळ असल्यानं ठाणे जिल्हा येणार हे उघड होतं. एका बाजूला आदिवासी डोंगरपट्टा आणि दुसऱ्या बाजूला वाढत्या औद्योगिक वसाहती यात जिल्ह्यातलं बदलतं लोकजीवन सर्वाधिक परिणाम करणारं ठरलं ते आदिवासींच्या दृष्टीनंच. बोईसर हे औद्योगिक केंद्र बनत चाललं तसं आजूबाजूच्या परिसराचं बकालीकरण व्हायला लागलं. नेटक्या आणि साध्या तरीही देखण्या आदिवासी पाड्यांचं झोपडपट्ट्यांत रूपांतर व्हायला लागलं. परप्रांतीय आले. गुंडगिरी आली. आदिवासी आधी स्वस्त मजूर बनले होते, आता कंत्राटी कामगार बनू लागले. सावकार, जमीनदार यांच्या जोडीनं आता कारखानदार शोषणात आपला वाटा उचलू लागले. त्या विरोधात दाद मागणंही कठीण होऊ लागलं.

भूमिसेनेकडं अशा अनेक तक्रारी यायला लागल्या होत्या. सत्तर आणि ऐंशीचं दशक कामगारांच्या लढ्यानंही गाजलं. भूमिसेनेनं तरुणांचे गट बांधले आणि या सर्व प्रश्नांवर एक अभूतपूर्व मोर्चा बोईसरमध्ये निघाला. तलवारीच्या धाकावर कंत्राटी पद्धत राबवणाऱ्या मालकवर्गाला चाप लावण्यासाठी या शक्तिप्रदर्शनाची गरज होतीच. ज्यांना पोलीसही हात लावत नसत, त्यांना भूमिसेनेच्या मोर्चामुळं अटक झाली. मात्र तरीही असंघटित क्षेत्रात कामगारांचा प्रश्न कायम होताच. वर्षातले अनेक दिवस रोजगार नसलेले छोटे शेतकरी पोटासाठी वीटभट्टी, नदीतून रेती काढणं, बांधकाम मजूर, हमाली, वनकामगार, मीठागर कामगार अशा असंघटित क्षेत्रात मोडणाऱ्या कामांवर जाऊ लागले होते. मजुरीचा दर, कामाचे तास इत्यादींबाबत त्यांची फसवणूक हे नित्याचं चित्र झालं. भूमिनेनेनं या विरोधात लढे उभारले. मजुरीत वाढ मागताच स्त्री-पुरुषांना समान वेतन मिळावं यासाठीही संघटना आग्रही राहिली.

काळुरामकाकाचं सारं आयुष्य संघर्षमय आहे. त्याला




उन्हातान्हात आणि डोंगरदऱ्यात जेवढं सुरक्षित वाटतं तेवढं शहरी सुखसोयींत कोंडल्यासारखं वाटतं आणि बैठ्या कामात तर त्याचं टकुरंच फिरतं. तरीही त्यानं एकदा बँक ऑफ महाराष्ट्राच्या संचालकमंडळावर काम केलेलं आहे. दुसरं कोणी असतं तर प्रवास, भत्ते, सोयी-सवलती यांचा लाभ घेतला असता. पण काळुरामकाकालां दिसलं की जुजबी ठराव करण्यासाठी लांबवर बैठका घेतल्या जातात आणि त्यांवर नाहक लाखो रुपये उधळले जातात. बँकेत श्रीमंत लोकांना विशेष वागणूक मिळते आणि गरिबाला मात्र पत नसते याचा पदोपदी त्याला अनुभव येत होता. मोठ्या लोकांची कर्ज, त्यांची थकबाकी याकडं कानाडोळा 'करणाऱ्या बँका गरिबाच्या छोट्या रकमांसाठी मात्र त्याच्या किडूकमिडूक संसारावर टाच आणते हे पाहून तो अस्वस्थ झाला. त्याच्या दृष्टीनं या संचालकपदाचा एकच उपयोग झाला. त्या निमित्तानं तो वेगवेगळे प्रांत फिरला. तेथल्या आदिवासींना भेटला. विचारांची देवाणघेवाण केली.

काळुरामकाकाशी गप्पा मारायला लागलं की घड्याळाच्या काट्याकडं पाहण्याची सोय नसते. मांडी ठोकून त्याची रसवंती सुरू होते. बरं, सांगण्यातही काही कालसंगती असेलच असं नाही. त्याला जसं आठवेल तशा एकेक आठवणी तो सांगतो. काळ आणि घटनाक्रम यांची संगती आपण लावायची. कधी तो 'जबरन जोत'विषयी सांगतो, कधी आमगावला सावकारांच्या माणसांना कसं शेपाटून लावलं हे रंगात येऊन सांगतो. पण त्यामुळेच त्याचं वेगळेपण ठसत जातं आणि त्याचवेळी जाणवतं केवढं काम करून ठेवलंय याने आणि केवढा झगडलाय हा! आणि तरीही तो सांगतोय तसं हे सारं कर्तृत्व किती बेदखल आहे!! खरं तर एका संघर्षपर्वाचा हा नायक आहे. पण त्याचा इतिहास तुटक तुटकच लिहिला गेलाय का? आपले ढोलताशे आपणच वाजवायच्या आजकालच्या दिवसांत काळुरामकाका अजूनही असा बेफिकीर आणि अस्ताव्यस्त कसा? इथल्या वर्चस्ववादी व्यवस्थेबरोबर तर त्याचं भांडण आहेच, पण आधुनिकतेच्या नावाखाली येणाऱ्या भौतिकतेशीही याचा उभा दावा आहे. आपल्या उन्मुक्त, रानावारा प्यायलेल्या मोकळ्याढाकळ्या जीवनशैलीबद्दल त्याला किती परिपूर्ण विश्वास आहे! त्याचा हा विश्वास असाच अढळ राहो. त्यावरच त्याला बंधुभावानं पण काहीसं लांबून पाहणाऱ्या 'आपल्या'सारख्यांचं आत्मपरीक्षण विसंबून आहे.

❑❑

# महाराष्ट्र फाउण्डेशन समाजकार्य गौरव पुरस्कार

## १९९६

| | | |
|---|---|---|
| समाजप्रबोधन (संस्था) | : | महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, सातारा |
| समाजप्रबोधन (व्यक्ती) | : | विलास वाघ, पुणे |
| पर्यावरण-संवर्धन (व्यक्ती) | : | वासुदेवराव चित्रे, पालघर |
| स्त्रियांचे प्रश्न (व्यक्ती) | : | विजया चौक, धुळे |
| वैशिष्ट्यपूर्ण समाजकार्य | : | रा. वि. भुस्कुटे, अंबरनाथ |

## १९९७

| | | |
|---|---|---|
| स्त्रियांचे प्रश्न (संस्था) | : | कागद, काच, पत्रा कष्टकरी पंचायत, पुणे |
| समाजप्रबोधन (संस्था) | : | लोक विज्ञान संघटना, पुणे |
| स्त्रियांचे प्रश्न (व्यक्ती) | : | शुभदा देशमुख, गडचिरोली |
| पर्यावरण-संतुलन/संरक्षण (व्यक्ती) | : | विजय नारकर, देवरूख |
| वैशिष्ट्यपूर्ण समाजकार्य (व्यक्ती) | : | लीला पाटील, कोल्हापूर |

## १९९८

| | | |
|---|---|---|
| पर्यावरण-संतुलन/संरक्षण (संस्था) | : | निसर्ग मित्र मंडळ, औरंगाबाद |
| समाजप्रबोधन (व्यक्ती) | : | जयंत गडकरी, मुंबई |
| स्त्रियांचे प्रश्न (व्यक्ती) | : | बापुसाहेब नागाप्पा म्हेत्री, गडहिंग्लज |
| पर्यावरण-संतुलन/संरक्षण (व्यक्ती) | : | हुमायून अब्दुलअली, मुंबई |
| वैशिष्ट्यपूर्ण समाजकार्य (व्यक्ती) | : | सुरेखा दळवी, पेण |

## १९९९

| | | |
|---|---|---|
| प्रबोधन (संस्था) | : | समाजवादी प्रबोधिनी, इचलकरंजी |
| समाजप्रबोधन (व्यक्ती) | : | मोहन हिराबाई हिरालाल, चंद्रपूर |
| स्त्रियांचे प्रश्न (व्यक्ती) | : | रेहाना बैलिम, अमरावती |
| पर्यावरण-संतुलन/संरक्षण (व्यक्ती) | : | कुसुम कर्णिक, पुणे |
| वैशिष्ट्यपूर्ण समाजकार्य (व्यक्ती) | : | भरत कावळे, नाशिक |

## २०००

| | | |
|---|---|---|
| स्त्रियांचे प्रश्न (संस्था) | : | महिला हक्क संरक्षण समिती, नाशिक |
| समाजप्रबोधन (व्यक्ती) | : | मनोहर कदम, मुंबई |
| पर्यावरण-संतुलन/संरक्षण (व्यक्ती) | : | चिं. धों. आसवले, पुणे |
| वैशिष्ट्यपूर्ण समाजकार्य (व्यक्ती) | : | संजय संगवई, पुणे |




# सेवाव्रती डॉ. म्हसकर

■ प्रा. शिल्पा नेवे

महाराष्ट्राला सेवाभावी कार्यांची मोठी परंपरा आहे. डॉ. बाबा आमटे, डॉ. अभय बंग, डॉ. रजनीकांत आरोळे अशी अनेक नावं सांगता येतील. या परंपरेत आवर्जून उल्लेख केला पाहिजे तो डॉ. प्र. रा. तथा आप्पासाहेब म्हसकर यांचा. खून, मारामाऱ्या, बलात्कार, लैंगिक शोषण, भ्रष्टाचार यांचं प्राबल्य असणाऱ्या या वातावरणात 'डॉ. म्हसकर वैद्यकीय प्रतिष्ठान'सारख्या संस्थेचं कार्य अधिक महत्त्वाचं ठरतं.

डॉ. प्रभाकर तथा आप्पासाहेब म्हसकरांच्या घरी डॉक्टरकीची परंपराच होती. आप्पांचे आजोबा अण्णासाहेब तसेच वडील रामभाऊ तथा दादासाहेब म्हसकर हे डॉक्टरच होते. त्यांचे अनेक कुटुंबीयही पेशाने डॉक्टर आहेत. अशा परिस्थितीत डॉक्टरकीचा हा वारसा आप्पासाहेबांकडे येणे हे स्वाभाविकच होते. आपले वैद्यकीय शिक्षण पूर्ण केल्यावर आप्पांनी काही वर्षे वडिलांच्या हाताखाली काम केले. हा अनुभव इतका दांडगा होता की सर्जन नसतानाही आप्पासाहेब कोणतीही शस्त्रक्रिया लीलया करू लागले. वैद्यकीय व्यवसायात लवकरच त्यांचा जम बसला. एक निष्णात डॉक्टर अशी ख्याती मिळाली. मनात आणले असते तर ते खोऱ्याने पैसा ओढू शकले असते. पण सेवाव्रती म्हसकरांनी पैशाला जीवनसर्वस्व कधीच मानले नाही. कित्येक रुग्णांवर त्यांनी अल्पदरात वा विनामूल्य उपचार केले. आप्पांची मेडिकल कॉलेजची ॲडमिशन एका टक्क्यासाठी नाकारली गेली तेव्हा औंधच्या राजांनी गव्हर्नरला पत्र लिहिले आणि आप्पांना ॲडमिशन मिळाली. त्यांचे ऋण आप्पा कधीच विसरले नाहीत. औंध संस्थानात तर त्यांनी शेकड्यांनी विनामूल्य शस्त्रक्रिया केल्या.

आप्पांच्या बालवयात अंमळनेरच काय सारा महाराष्ट्रच साने गुरुजी नावाच्या मंत्रशक्तीने भारला होता. विद्यार्थिवयात आप्पासाहेबही साने गुरुजींच्या प्रभावाखाली आले. गुरुजींच्या मार्गदर्शनाखाली ग्रामसफाईसारखी कामे त्यांनी केली. अशा संस्कारात वाढलेल्या आप्पासाहेबांना साहजिकच रुग्णांकडून पैसे उकळणे, त्यांना विविध तपासण्यांच्या फेऱ्यात अडकवणे हा प्रकार मानवणारा नव्हता. आपल्या वैद्यकीय ज्ञानाचा लाभ केवळ शहरवासीयांनाच व्हावा व आपण सुखासमाधानात आयुष्य व्यतीत करावे असे त्यांना वाटत नव्हते. शहरवासी रुग्ण डॉक्टरांच्या दवाखान्यात सहजपणे येऊ शकतात. वैद्यकीय सेवेचा लाभ घेऊ शकतात. परंतु डॉक्टरांच्या



फिरत्या रुग्णालयात डॉ. म्हसकर रुग्णाला तपासताना

दवाखान्यापर्यंत पोहोचू न शकणाऱ्या रुग्णांची संख्या या देशात हजारो पटींनी जास्त आहे. त्यांच्यासंबंधी काही जबाबदारी आपल्यावर नाही का? ज्यांच्याजवळ डॉक्टरकडे जाण्यासाठी सोयी नाहीत, साधने नाहीत, पैसा नाही आणि तसे ज्ञानही नाही अशा असंख्य रुग्णांचे भवितव्य काय? ग्रामीण भागात असे हजारो रुग्ण आहेत ज्यांना उपचाराअभावी प्राणास मुकावे लागते. यांसारखे अनेक विचार आप्पासाहेबांच्या मनात घोळू लागले. त्यातूनच 'रामकृष्ण फिरते रुग्णालय' जन्माला आले. रुग्ण डॉक्टरपर्यंत जाऊ शकत नाहीत तर डॉक्टरनेच रुग्णापर्यंत जावे ही कल्पना प्रत्यक्षात उतरली. शहरातून त्यांच्याकडे खूप रुग्ण येत असत म्हणून शहरातच



फिरते रुग्णालय

पहिले वैद्यकीय शिबिर घेतले आणि इथूनच त्यांच्या झपाटलेपणाला सुरुवात झाली.

आप्पांनी घडीचे फिरते रुग्णालय उभे करण्याचा ध्यासच घेतला. शिंदखेड्यात एक मोठा लोखंडी सांगाडा उभाही केला. परंतु त्यातून फिरते रुग्णालय काही उभे राहिले नाही. उलट त्यावर केलेला पन्नास-साठ हजारांचा खर्च वाया गेला. कोणतीही अभिनव कल्पना समाजात रुजायला वेळ लागतोच. अनेकदा विरोधही सहन करावा लागतो. आप्पांनाही या दिव्यातून जावे लागले. त्यांचा मोठा जामानिमा पाहून कंडक्टर बस थांबवत नसत तर तंबू उभारणारे डॉक्टर पाहून गावकरी टिंगलटवाळी करीत. परंतु आप्पा हटले नाहीत. घरची जमीन विकून, बँकेकडून कर्ज घेऊन त्यांनी पैसा उभा केला. एक जुनी एस. टी. खरेदी करून त्यातली आसने काढून त्यात शस्त्रक्रियागृह उभारले. या फिरत्या रुग्णालयाने असंख्यांना आरोग्य प्रदान केले. अक्षरशः हजारोंना जीवदान दिले. आप्पांच्या कार्याची कीर्ती पसरू लागली. टिंगल करणारे लोकच शिबिराचे तंबू उभारू लागले.

आप्पांच्या संस्थेकडे आता पैशाची कमतरता नाही. अद्ययावत शस्त्रक्रियासाधनांनी सुसज्ज असे शस्त्रक्रियागार, रोगनिदान गृह, रुग्णनिवास गृह, आप्पांसाठी निवास गृह, स्वयंपाक व जेवणाची व्यवस्था तसेच रुग्णवाहिका असा 'रामकृष्ण फिरते रुग्णालया'चा मोठा पसारा आहे. वर्षाचे आठ ते दहा महिने या फिरत्या घरातच त्यांचे वास्तव्य असते. या फिरत्या दवाखान्याच्या माध्यमातून त्यांनी शेकडो शिबिरे घेतली आहेत. लाखाच्यावर रुग्णांवर उपचार केले आहेत तर वीस हजारांवर शस्त्रक्रिया केल्या आहेत. काही अपवाद सोडल्यास या आरोग्यसेवेचे मूल्यही त्यांनी घेतले आहे. कारण फुकट सेवेला लोकांच्यालेखी फारसे महत्त्व नसते हे ते जाणून आहेत. मात्र पैसे नाहीत म्हणून कोणा रुग्णाला त्यांनी विन्मुख पाठविले नाही. आप्पांच्या संगमनेरच्या शिबिराचे काम पाहायला टाटांच्या 'टेल्को'चे लोक आले होते. ते आप्पांच्या कामाने इतके प्रभावित झाले की त्यांनी टाटांची एक गाडी आप्पांच्या कार्यासाठी भेट दिली. स्पेनच्या मॅनॉस युनिडास या संस्थेनेही आप्पांना सर्व वैद्यकीय सोयीसुविधांनी युक्त अशी गाडी भेट दिली आहे.

अर्थातच् डॉक्टर म्हसकरांच्या या सेवाकार्यात त्यांच्या पत्नी डॉ. कमल यांचाही मोठा वाटा आहे. जिथे कधी वीजही पोचली नव्हती अशा दुर्गम भागात या जोडप्याने काम सुरू केले. वाड्या-वस्त्यांवर, आदिवासी पाड्यांवर ते गेले. लोकांवर उपचार तर केलेच पण त्यांना उत्तम



तात्यासाहेब तथा वि. वा. शिरवाडकर यांच्यासोबत डॉ. म्हसकर



**मुलांना वैयक्तिक स्वच्छतेचे धडे देताना**

आरोग्याची दीक्षा दिली. स्वच्छतेचा मंत्र दिला. उपलब्ध शक्यतांतून उत्तम आहाराचे तंत्र दिले. शिक्षणाची संस्था दिली, सहकाराची मात्रा दिली. कित्येक दिवसात शरीराला पाण्याचा स्पर्शही न झालेल्या, सारे अंग खरजेने भरलेल्या मुलांनाही ते ममतेने जवळ घेऊन स्वहस्ते आंघोळ घालतात. मलम लावतात. या मुलांची वाढलेली नखे कापतात. त्यांचे फाटके कपडे शिवून देतात. मळके कपडे धुवून देतात. त्यांच्याशी गप्पा मारतात, गोष्टी सांगतात. त्यांच्याबरोबर गाणी म्हणतात. थोरा-मोठ्यांची चरित्रे ऐकवतात आणि हे सर्व करत असताना या मुलांच्या पालकांनाही आरोग्यावर व्याख्याने देतात. व्हिडिओ चित्रफितींचा उपयोग करून आरोग्यविषयक प्रशिक्षणही देतात. डॉ. कमलताई आदिवासी स्त्रियांसाठी मंडळे काढतात. त्यातून लघुउद्योगांचे प्रशिक्षण देतात. स्त्रियांच्या आरोग्यावर आणि आजारांवर त्यांच्याशी चर्चा करतात. बाळंतिणींना मार्गदर्शन करतात. संततिनियमनाचा प्रचार करतात.

हे कार्य येथेच थांबत नाही. नुकतेच त्यांनी एक नवे काम हाती घेतले आहे. महाराष्ट्र फाउण्डेशन, अमेरिका यांच्या सौजन्याने 'डॉक्टर म्हसकर वैद्यकीय प्रतिष्ठान', अंमळनेरमार्फत कर्जवाटप योजना राबविली जात आहे. अंमळनेर तालुक्यातील होतकरू जनतेने अर्थसाहाय्य घेऊन स्वयंरोजगार करावा; या रोजगाराच्या उत्पन्नातून आपल्या कुटुंबाचा चरितार्थ चालवावा आणि आपले राहणीमान सुधारावे, हा या योजनेचा उद्देश आहे. लाभार्थींच्या इच्छेनुसार कर्जाचे स्वरूप लक्षात घेऊन कर्ज परतफेडीचा हप्ता ठरवून दिला जातो.

आज डॉ. आप्पा म्हसकरांचे वय ७५च्या पुढे आहे. त्यांच्यावर एक बायपास शस्त्रक्रियाही झाली आहे. हृदयविकाराने विळखा घातला आहे. अशा परिस्थितीतही आप्पा गुजरातच्या भूकंपाची भयानकता जाणून आपल्या दहा सहकाऱ्यांच्या पथकासह धावून जातात. मेळघाटातील अतिदुर्गम भागात राहून कुपोषित मुले आणि माता यांच्यावर उपचार करतात. एखाद्या वटवृक्षाप्रमाणे सर्व शक्तीनिशी आप्पा उभे आहेत. त्यांचे कार्य असेच पुढे वृद्धिंगत होवो आणि त्यासाठी त्यांना दीर्घायुष्य लाभो, अशाच शुभेच्छा त्यांना या सन्मानाच्या निमित्ताने द्यायला हव्यात.

□□



## लोकोद्धारक आत्मज्ञानी

# न्यायरत्न विनोद

■ भा. द. खेर

भारतात स्वातंत्र्योत्तर काळात अशा अनेक उच्च विद्या-विभूषित व्यक्ती होत्या की ज्यांनी लोकसेवा, लोकजागृती, सांस्कृतिक आणि सामाजिक कार्याद्वारे समाजसेवा केली. कसलीही वाच्यता न करता समाजसेवेसाठी देह झिजविला. प्रसिद्धीपराङ्मुख राहून त्यांनी स्वीकृत कार्य केलेले असल्याने त्यांच्या या समाजसेवेवर त्या काळात प्रकाश पडला नाही. किंवा त्यांनी तो पडणार नाही याची खबरदारी घेतली. तो सारा काळ गुप्तपणे कार्य करण्याचाच होता. लोकजागृतीचे, समाजउत्थापनाचे कार्य करीत आहे याची इंग्रज सरकारला तपशीलवार माहिती कळणे धोक्याचे होते. इंग्रज सरकारची वक्रदृष्टी कोणाकडे कधी



**महर्षि न्यायरत्न विनोद यांचेबरोबर प्रख्यात टीकाकार व साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष श्री. के. क्षीरसागर**

निवड केली. न्यायरत्नांनी हे साक्षनिर्णयाचे काम मान्य केले आणि त्यासाठी निरनिराळ्या ग्रंथालयातील ग्रंथांचा अभ्यास केला. प्रत्यक्ष साक्षीसाठी कोर्टात जाताना त्यांनी दोन मोठ्या ट्रंका भरून ग्रंथ नेले. कोर्टासमोर न्यायरत्नांची दोन दिवस साक्ष झाली. त्या वेळी त्यांनी 'गुरव हे ब्राह्मण ज्ञातीचे आहेत' हे सिद्ध करणारे अनेक पुरावे ग्रंथांच्या माध्यमातून कोर्टासमोर मांडले. कोर्टाने हे सर्व पुरावे आणि त्यासंबंधीचे न्यायरत्नांचे विवेचन ग्राह्य मानले आणि अखेरीस 'गुरव हे ब्राह्मण ज्ञातीचे आहेत' असा ऐतिहासिक निर्वाळा दिला.

सामाजिक जागृतीसाठी न्यायरत्नांनी भारतभर संचार केला. या संचारात त्यांनी म. गांधी, पंडित नेहरू, मदन मोहन मालवीय, सुभाषचंद्र बोस, डॉ. खरे, बापूजी अणे, गोविंद वल्लभपंत, बॅ. सावरकर, लॉर्ड लिनलिथगो अशा अनेक थोर पुरुषांच्या भेटी घेऊन सामाजिक जागृतीविषयी चर्चा केल्या. मागोमाग व्याख्यानमाला गुंफल्या. गोजीवन चौंडेमहाराज हे त्या काळात गायींच्या रक्षणाचे कार्य करीत होते. त्यासाठी त्यांनी 'गोवर्धन संस्थे'ची स्थापना केली. श्री. चौंडेमहाराज यांच्या कार्यात न्यायरत्नांनी आपला सहभाग दिला आणि देशाला होणाऱ्या फार मोठ्या गो-हत्येला प्रतिबंध करण्याचा प्रयत्न केला. गोवधासाठी लाहोर येथे एक मोठा कत्तलखाना सुरू करण्यात आला होता. श्री. चौंडेमहाराज आणि न्यायरत्न यांनी हा कत्तलखाना बंद करण्याचे आव्हान स्वीकारले. त्या कामी देशातील विविध ठिकाणच्या राष्ट्र-पुरुषांशी त्यांचे संबंध प्रस्थापित झाले. लॉर्ड लिनलिथगो यांच्याबरोबर सल्लामसलत करून गोहत्याबंदीचे महत्त्व त्यांनी त्यांना पटवून दिले आणि अशा अखंड प्रयत्नातून लाहोरचा कत्तलखाना बंद पाडून देशाचे गो-धन सुरक्षित राखले.

पंडित मदन मोहन मालवीय यांनी बनारसच्या 'विश्व हिंदू परिषदे'मध्ये 'हिंदू धर्म आणि धर्मशास्त्र' या विषयावर व्याख्यानमाला गुंफण्यासाठी न्यायरत्नांना निमंत्रित केले. न्यायरत्नांनी सात दिवस ही व्याख्यानमाला गुंफली. पं. मदन मोहन मालवीय हे मोठे विद्वान, पण न्यायरत्नांच्या पांडित्याने ते प्रभावित झाले.

❑❑




**पन्नालाल सुराणा**
पत्रकार आणि समाजवादी
चळवळीतील कार्यकर्ते



**कुमार शिराळकर**
शेतकरी, शेतमजूर, आदिवासी
चळवळीतील कार्यकर्ते



**पुष्पा भावे**
महाराष्ट्रातील परिवर्तनवादी
चळवळीच्या अभ्यासक,
सामाजिक कृतज्ञता निधीच्या
विश्वस्त



**नागेश हटकर**
आदिवासी व असंघटित कामगार
चळवळीतील कार्यकर्ते



**मृणाल गोरे**
केशव गोरे स्मारक ट्रस्ट
अध्यक्ष
महाराष्ट्र फाउण्डेशन समाजकार्य
गौरव पुरस्कार समिती


# महाराष्ट्र फाउण्डेशन समाजकार्य गौरव पुरस्कार २००१ सल्लागार समिती, मुंबई



**आनंद करंदीकर**
महाराष्ट्रातील परिवर्तनवादी
चळवळीचे अभ्यासक



**अर्जुन डांगळे**
साहित्यिक व आंबेडकरवादी
चळवळीतील कार्यकर्ते



**उल्हास राणे**
पर्यावरण तज्ज्ञ, बॉम्बे नॅचरल
हिस्टरी सोसायटीच्या कार्यकारी
मंडळाचे सदस्य



**सुरेश कराळे**
पत्रकार



**रवी देवगडकर**
प्राध्यापक व सामाजिक
कार्यकर्ते

# निवड / सल्लागार समिती (अमेरिका)



**सुनील देशमुख**



**अरुण गांधी**

भारतातील जातिव्यवस्था, अमेरिकेतील वंशवाद आणि दक्षिण आफ्रिकेतील वर्णसंघर्ष यांवर सातत्याने कार्य, 'एम. के. गांधी इन्स्टिट्यूट फॉर नॉन-व्हायलंस' या संस्थेचे संस्थापक.



**शोभा चित्रे**

वॉशिंग्टन डी. सी.

'गोठलेल्या वाटा' आणि 'पानगळीच्या आठवणी' या पुस्तकांच्या लेखिका. अनेक नियतकालिकांतून, विशेषत: 'मौज'मधून, सातत्याने ललित-लेखन, अनेक सांस्कृतिक आणि सामाजिक कार्यात सहभाग.



**डॉ. अरुंधती विनोद**

स्त्रीरोगतज्ज्ञ, टेनाफ्लाय, न्यू जर्सी
अनेक सेवाभावी संस्थाशी संबंधित.



**सुनीता धुमाळे**

अमेरिकेमध्ये 'दक्षिण आशियाई महिलांचे प्रश्न' हे प्रमुख कार्यक्षेत्र. तेथील मराठी स्त्रियांमध्ये 'आत्मभान' जागविण्याचे कार्य.
हॉस्पाईसारख्या संस्थेच्या सल्लागार.



**प्रा. डॉ. जयंत लेले**

क्वीन विद्यापीठातील समाजशास्त्राचे अध्यापक, विविध सामाजिक विषयांचे चिंतनशील अभ्यासक व लेखक.

## महाराष्ट्र फाउण्डेशन

'महाराष्ट्र फाउण्डेशन' ही अमेरिकेतील मराठी माणसांची संस्था आहे.

१९७८ साली या संस्थेची स्थापना झाली. समाजसेवेची भावना ही या संस्थेच्या स्थापनेमागील प्रेरणा आहे. समाजातील दुर्बल घटकांच्या समस्यांचे निवारण करून त्यांना स्वत:च्या पायावर उभे करण्याचा प्रयत्न ही संस्था करीत आहे.

आदिवासींमध्ये शिक्षणप्रसार, अपंगांचे पुनर्वसन, गावातील आरोग्यसेवेची सुधारणा, शेतीतील उत्पादनवाढीचे प्रयोग यांसारखे समाजोपयोगी उपक्रम करणाऱ्या ध्येयवादी संस्थांना आर्थिक व श्रमदानाचे साहाय्य 'महाराष्ट्र फाउण्डेशन' या संस्थेद्वारे होत असते.

रुग्णवाहिका, एड्स चिकित्सा प्रयोगशाळा, ग्राम-दत्तक योजना वगैरेंसारख्या कल्याणकारी स्वरूपाच्या योजनांना 'महाराष्ट्र फाउण्डेशन' साहाय्य करीत असते. अलीकडच्या काळात 'कॉम्प्युटर सेंटर फॉर सोशल चेंज' या योजनेखाली संगणक शिक्षणाचा प्रसार व्हावा

म्हणून महाराष्ट्रातील विविध शिक्षण संस्थांना संगणकांचे संच भेट देण्याची योजना कार्यान्वित केली आहे.

तसेच नाशिक येथील 'रचना ट्रस्ट'च्या मार्गदर्शनाखाली स्त्रियांना फुलांच्या, फळांच्या प्रक्रियेचे प्रशिक्षण देऊन त्यांची रोजगार मिळविण्याची क्षमता वाढावी, असे प्रयत्न सुरू केले आहेत. त्याकरिता 'महाराष्ट्र फाउण्डेशन' साहाय्य करते. आदिवासी व मुस्लिम स्त्रियांना उत्पन्नाचे साधन होईल अशा प्रकारचे जे प्रशिक्षण 'महात्मा गांधी लोकसेवा संघा'तर्फे दिले जाते, त्याकरिताही 'महाराष्ट्र फाउण्डेशन' मदत करते.

Invest in Future
of Those
Who Have No Future...
so They Can Reinvest

ही 'महाराष्ट्र फाउण्डेशन'ची घोषणा आहे.

लोकशिक्षण, जनसंघटन, जनआंदोलन अशा विविध मार्गांनी प्रश्नांची तड लावू पाहणाऱ्या अनेक व्यक्ती व संस्था महाराष्ट्रात सतत कार्यरत आहेत. अशा संस्था व व्यक्ती यांच्या कार्याबद्दल समाजाला वाटत असलेली कृतज्ञता अल्पांशाने का होईना, व्यक्त व्हावी व अशा समाजकार्याला प्रोत्साहन मिळावे, या हेतूने श्री. सुनील देशमुख यांच्या पुढाकाराने 'महाराष्ट्र फाउण्डेशन'ने 'समाजकार्य गौरव पुरस्कार योजना' कार्यान्वित करण्याचे ठरविले आहे.



# केशव गोरे स्मारक ट्रस्ट

केशव ऊर्फ बंडू गोरे हे महाराष्ट्रातील समाजवादी चळवळीतील एक तेजस्वी व्यक्तिमत्त्व होते. भारतीय स्वातंत्र्य चळवळ, गोवा मुक्ती आंदोलन यांतील त्यांच्या सहभागाबरोबरच मुंबईतील कामगार चळवळीतील त्यांचे योगदान मोलाचे आहे. मुंबई महापालिकेतील सफाई कामगार, तसेच असंघटित कष्टकऱ्यांना संघटित करण्यात केशव गोरे आघाडीवर होते. त्यांनी लिहिलेला 'आंतरराष्ट्रीय समाजवाद' हा ग्रंथ त्यांच्या व्यासंगाची झलक दाखवतो. १९५८ साली त्यांचे अल्पवयात निधन झाले. केशव गोरे यांच्या अकाली निधनानंतर चळवळीतील त्यांच्या सहकारी व पत्नी मृणाल गोरे आणि केशव गोरे यांचे चळवळीतील सहकारी व मित्र यांनी 'केशव गोरे स्मारक ट्रस्ट'ची स्थापना केली. 'ट्रस्ट'तर्फे समाजपरिवर्तनाच्या दृष्टिकोणातून प्रबोधनात्मक तसेच रचनात्मक आणि सेवाभावी कार्यक्रम राबविले जातात. 'ट्रस्ट'चे एक संदर्भ ग्रंथालय असून विविध सामाजिकशास्त्रांच्या संदर्भातील सुमारे ५,००० ग्रंथ या ग्रंथालयात उपलब्ध आहेत. राजकीय, सामाजिक, अभ्यासू कार्यकर्ते, संशोधन करणारे व महाविद्यालयीन विद्यार्थी यांना या सोयीचा लाभ मिळत आहे.

'ट्रस्ट'मध्ये एक 'डॉक्युमेंटेशन सेंटर' आहे. या केंद्रात नियतकालिकातील कात्रणे रीतसर जतन केली जातात. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जन्मदिनी तसेच २ फेब्रुवारी या केशव गोरे यांच्या स्मृतिदिनाच्या अनुषंगाने दरवर्षी व्याख्यानमाला आयोजित केली जाते. 'ट्रस्ट'तर्फे वेळोवेळी महत्त्वाच्या सामाजिक विषयांवर पुस्तिका प्रकाशित करण्यात येतात. परिसंवाद, चर्चासत्रे, शिबिरे अशा विविध माध्यमांतून विचारमंथनाला चालना देणारे कार्यक्रम 'ट्रस्ट'तर्फे आयोजित करण्यात येतात.

मुंबईतील राहण्याच्या जागांच्या अपुरेपणामुळे होणारी विद्यार्थ्यांची गैरसोय लक्षात घेऊन 'ट्रस्ट'तर्फे अभ्यासिका चालविण्यात येते. ४०० विद्यार्थी या अभ्यासिकेचा लाभ घेत आहेत.

मुंबई महानगरपालिकेच्या उन्नतनगर, गोरेगाव (प.) येथील दोन प्राथमिक शाळा, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी 'ट्रस्ट'ने दत्तक घेतल्या असून तीन डोंगरी, गोरेगाव (प.) या झोपडपट्टी विभागात 'कल्याण केंद्र' सुरू केले आहे.


'ट्रस्ट'च्या दोन्ही वास्तूंमध्ये वैद्यकीय चिकित्सा केंद्र, बालविकास केंद्र, बालवाड्या, प्रौढ साक्षरता वर्ग, दैनिके व नियतकालिके यांचे वाचनालय, असे अनेक उपक्रम 'ट्रस्ट'तर्फे चालविले जातात.

स्त्रियांसाठी कायदेशीर सल्ला देण्याचे व आवश्यक तेथे Counselling करण्याचे 'स्वाधार' संस्थेचे कार्य 'ट्रस्ट'च्या वास्तूतूनच केले जाते.

ट्रस्टच्या १९६० साली बांधलेल्या वास्तूमध्ये व गोरेगावातील तीन डोंगरी येथील झोपडपट्टीमध्ये १९९९ साली बांधलेल्या वास्तूमध्ये ट्रस्टचे कार्य चालते.

**विश्वस्त मंडळ**

श्री. र. गो. करमरकर, श्रीमती मृणाल गोरे,
श्रीमती कुसुम सामंत, श्री. कृष्णनाथ नेवरेकर,
श्री. मधू आडेलकर, श्री. श्रीनिवास प्रभू,
श्री. चंद्रकांत केळकर




# सुनील देशमुख

श्री. सुनील देशमुख हे मूळचे सांगलीचे. १९६४ साली एस.एस.सी. परीक्षेत बोर्डात चौथ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाल्यावर शिक्षणासाठी ते मुंबईत आले. १९७० साली मुंबई विद्यापीठाच्या केमिकल टेक्नॉलॉजी या विभागातून बी.केम. ही पदवी त्यांनी प्राप्त केली व पुढील शिक्षणासाठी ते अमेरिकेत गेले.

6455
9.5.2002

अमेरिकेमध्ये एम.एस. (केमिकल इंजिनिअरिंग), एम.बी.ए. या पदव्यांबरोबरच जे.डी. ही कायद्याची पदवीही त्यांनी मिळविली. अमेरिकेत वकिली करण्याचा परवानाही त्यांनी प्राप्त केला. नंतर अमेरिकेतच कमोडिटी ट्रेडर म्हणून वॉल स्ट्रीटवर त्यांनी अनेक वर्षे यशस्वी व्यवसाय केला.

आज त्यांची पत्नी प्रतिभा (पूर्वाश्रमीच्या प्रतिभा टिळक, विलेपार्ले) आणि गिरीश, निशा व सुशील ही तीन मुले यांच्यासह ते अमेरिकेतच स्थायिक झाले आहेत. व्यवसायात नेत्रदीपक यश मिळविणाऱ्या श्री. सुनील देशमुख यांना साहित्य व समाजसेवा याविषयी विशेष आस्था आहे.

वयाच्या ४६व्या वर्षी व्यवसायातून स्वेच्छेने निवृत्त झाल्यावर आठवड्यातील काही काळ सामाजिक सेवेच्या कामासाठी ते आवर्जून देत असतात.

